- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २४३ | किंमत : २ रूपये


**सोने-चांदी**
- ✔ २४ कॅरेट : १,४१,७०० /-
- ✔ २३ कॅरेट : १,४०,३५० /-
- ✔ चांदी : २,३५,३००/-


**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# गडचिरोलीत आश्रमशाळेतील ६ विद्यार्थिनींना सर्पदंश, तीन ठार

## तीन विद्यार्थिनी गंभीर जखमी

**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

गडचिरोलीच्या धानोरा तालुक्यातील जपतलाई निवासी आश्रम शाळेत सर्पदंशाने तीन विद्यार्थिनींचा मृत्यू, तर तीन विद्यार्थिनी जखमी असल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दीपिका लकडा, सुष्मिता मंडल आणि अनु कोरेटी असे मृत्यू झालेल्या तीन विद्यार्थिनींची नावे आहेत.

विद्यार्थिनी जेवणानंतर झोपलेले असताना रात्री दोन ते अडीच वाजताच्या सुमारास विद्यार्थिनींना सर्पदंश झाल्याची घटना समोर आली. या घटनेनंतर विद्यार्थिनींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, धानोरा रुग्णालयात उपचारादरम्यान इयत्ता सहावीतील दीपिका लकडा आणि इयत्ता आठवीतील सुष्मिता मंडल या दोन विद्यार्थिनींचा मृत्यू झाला. तर गडचिरोलीच्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असताना इयत्ता दुसरीतील अनु कोरेटी हिचाही मृत्यू झाला. दरम्यान, इयत्ता पाचवीतील दीपिका मदवी, सहावीतील कविता किरंगा आणि इयत्ता आठवीतील समृद्धी नैताम या तीन विद्यार्थिनींवर गडचिरोली जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यापैकी समृद्धी सुरेश नैतम हिची प्रकृती गंभीर आहे.

*डॉक्टरांनी अथक प्रयत्न करूनही उपचारादरम्यान तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाला, ज्यामुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. उर्वरित तीन विद्यार्थिनी वैद्यकीय देखरेखीखाली असून त्यांच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवले जात आहे. ग्रामीण आणि दुर्गम वनक्षेत्रातील आश्रमशाळांच्या वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांची सुरक्षा, प्रथमोपचाराची उपलब्धता आणि मूलभूत सुविधांबाबत स्थानिक नागरिक व विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांमध्ये तीव्र असंतोष आहे.*



### थोडक्यात

## चीन नाही, भारताला प्राधान्य

**नवी दिल्ली :** नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांनी भारतीय राजदूतांची भेट घेतलेली आहे. बालेन शाह यांनी नेपाळच्या पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतरची ही पहिलीच भेट असल्याचे म्हटले जात आहे. या सदिच्छा भेटीने नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांच्या परदेशी राजदूतांसोबतच्या स्वतंत्र संवादाला सुरुवात झाली असून थेट समोरासमोरच्या राजनैतिक संबंधांकडे एक स्पष्ट कल दिसून येतो, असे म्हटले जात आहे.

नेपाळमधील भारतीय राजदूत नवीन श्रीवास्तव यांनी सिंहदरबार येथील पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ कार्यालयात पंतप्रधान बालेन शाह यांची भेट घेतली. या बैठकीदरम्यान नेपाळ-भारत संबंधांच्या विविध पैलूंवर चर्चा करण्यात आली. यात परस्पर मैत्री, सामायिक हितसंबंध, विकास भागीदारी आणि चालू असलेल्या सहकार्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. भारतीय राजदूतांनी पंतप्रधान बालेन शाह यांना शुभेच्छा दिल्या. दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ करण्याच्या भारताच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. पंतप्रधान बालेन शाह यांनी शेजारी देशांमधील ऐतिहासिक संबंध अधिक दृढ करण्याच्या गरजेवर भर दिला. पदभार स्वीकारल्यापासून पंतप्रधान बालेन शाह यांनी एका परदेशी राजदूतासोबत समोरासमोर द्विपक्षीय चर्चा करण्याची ही पहिलीच वेळ आहे. यापूर्वी बालेन शाह यांनी राजदूतांसोबत एक-एक बैठका टाळण्याची कठोर भूमिका घेतली होती. या बैठकांपेक्षा गटचर्चेला प्राधान्य दिले होते. बालेन शाह यांनी यापूर्वी अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर किंवा भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांची भेट घेतली नव्हती.

# रेखा अंबुरेंचे कुणबी प्रमाणपत्र रद्द झाल्याचा दावा फोल

## मनोज जरांगे-पाटील यांच्या आरोपानंतर बीड प्रशासनाचा खुलासा, अधिकृत रद्द आदेश किंवा नोंदच नाही

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

रेखा अंबुरे यांच्या कुणबी जात प्रमाणपत्रावरून सुरू झालेल्या राजकीय वादाला बीड जिल्हा प्रशासनाच्या खुलाशामुळे नवे वळण मिळाले आहे. रेखा अंबुरे यांचे कुणबी जात प्रमाणपत्र रद्द करण्यात आलेले नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले असून, प्रमाणपत्र रद्द केल्याचा कोणताही अधिकृत आदेश अथवा त्यासंबंधीची नोंद उपलब्ध नसल्याचेही प्रशासनाने नमूद केले आहे.

रेखा अंबुरे यांच्या कुणबी जात प्रमाणपत्रावरून मनोज जरांगे-पाटील यांनी आरोप केल्यानंतर या प्रकरणाची राजकीय चर्चा सुरू झाली होती. त्यानंतर रेखा अंबुरे यांचे कुणबी प्रमाणपत्र रद्द झाल्याच्या बातम्याही प्रसारित झाल्या. मात्र, बीड जिल्हा प्रशासनाने अधिकृत नोंदींच्या आधारे हा दावा स्पष्टपणे फेटाळला आहे.

प्रशासनाच्या पत्रानुसार, २०२५ मध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत रेखा अंबुरे यांची मागास प्रवर्गझमहिला या प्रवगार्तून निवड झाल्याचा उल्लेख आहे. त्यांच्या कुणबी जात नोंदीबाबत आक्षेप नोंदविण्यात आल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मात्र, त्या आधारावर जात प्रमाणपत्र रद्द करण्याची अधिकृत कार्यवाही झालेली नसल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.



मनोज जरांगे-पाटील यांनी प्रसारमाध्यमांसमोर केलेल्या दाव्याचा प्रशासनाच्या पत्रात संदर्भ देण्यात आला आहे. मात्र, त्यांच्या निवेदनातील माहिती आणि प्रशासनाकडे उपलब्ध अधिकृत अभिलेख यामध्ये तफावत असल्याचे प्रशासनाने निदर्शनास आणून दिले आहे. त्यामुळे रेखा अंबुरे यांचे कुणबी प्रमाणपत्र रद्द झाल्याचा दावा सध्या अधिकृत नोंदींच्या आधारे सिद्ध होत नाही. प्रमाणपत्राच्या वैधतेबाबत पुढील कोणतीही कार्यवाही झाल्यास ती सक्षम प्राधिकरणाच्या अधिकृत निर्णयानंतरच स्पष्ट होणार आहे.

## माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांना जामीन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इंधन आणि स्वयंपाकाच्या गॅसच्या वाढत्या दरांविरोधात २०१७ मध्ये नागपुरातील संविधान चौकात काँग्रेसने केलेले आंदोलन तब्बल काही वर्षांनी पुन्हा चर्चेत आले आहे. या आंदोलनादरम्यान परवानगीच्या अटींचे उल्लंघन करून काही आंदोलकांनी रिझर्व्ह बँकेच्या मुख्य प्रवेशद्वाराकडे धाव घेतल्याचा, पोलिसांशी धक्काबुक्की केल्याचा आणि वाहतूक रोखल्याचा आरोप आहे. याच प्रकरणातील खटल्याच्या सुनावणीसाठी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि विद्यमान जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील सोमवारी नागपूरच्या न्यायालयात हजर झाले.

२६ सप्टेंबर २०१७ रोजी काँग्रेसच्या वतीने संविधान चौक येथे जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या दरांचा निषेध करण्यासाठी धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले होते. आंदोलनादरम्यान प्रमुख नेत्यांची भाषणे झाल्यानंतर काँग्रेसचे प्रतिनिधी मंडळ रिझर्व्ह बँकेत निवेदन देण्यासाठी गेले. त्यावेळी ५० ते ७० आंदोलकांनी परवानगीच्या अटींचे उल्लंघन करीत घोषणाबाजी केली आणि रिझर्व्ह बँकेच्या मुख्य गेटकडे धाव घेतली, असा पोलिसांचा आरोप आहे.आंदोलकांनी पोलिसांशी धक्काबुक्की आणि बाचाबाची केली तसेच रिझर्व्ह बँकेच्या आवारात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला; मात्र आंदोलक ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते, असा पोलिसांचा दावा आहे. काही आंदोलक लोखंडी गेटवर चढले. त्यानंतर रस्त्यावर बसून वाहतूक रोखण्यात आली.

आंदोलनादरम्यान केंद्र आणि राज्य सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पुतळा जाळण्यात आल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. या घटनांनंतर सदर पोलिसांनी संबंधित आंदोलकांविरोधात गुन्हा दाखल करून प्रकरण न्यायालयात नेले. या प्रकरणात पृथ्वीराज चव्हाण आणि राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह आमदार विकास ठाकरे, प्रदेश काँग्रेस सचिव उमाकांत अग्निहोत्री, माजी नगरसेवक प्रशांत धवड आणि प्रज्ञा बडवाईक अशा सहा जणांविरोधात खटला दाखल करण्यात आला आहे. बेकायदेशीर जमाव गोळा करणे (भादंवि कलम १४३), दंगल किंवा हिंसाचार करणे (कलम १४७), समान उद्दिष्ट ठेवून गुन्हा करणे (कलम १४९), वाहतुकीला बेकायदेशीरपणे रोखणे (कलम ३४१), लोकसेवकांना कर्तव्य बजावण्यापासून रोखण्यासाठी दुखापत करणे (कलम ३३२), सरकारी कामात अडथळा आणणे (कलम ३५३) आणि सक्षम अधिकाऱ्याच्या आदेशाचे उल्लंघन करणे (महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५), या तरतुदींनुसार प्रकरण दाखल करण्यात आले आहे.

# कोलंबियात ७.४ रिश्टर स्केलचा विनाशकारी भूकंप; २० जणांचा मृत्यू

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

दक्षिण अमेरिकेतील कोलंबिया देशामध्ये ७.४ रिश्टर स्केल तीव्रतेचा विनाशकारी भूकंप झाला. या भीषण भूकंपामुळे आतापर्यंत किमान २० जणांचा मृत्यू झाला असून अनेक इमारती पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळल्या आहेत. ढिगाऱ्याखाली अनेक नागरिक अडकल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक प्रशासनाने परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे जाहीर केले आहे.



युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सर्व्हे आणि स्थानिक भूकंपशास्त्र केंद्रानुसार, भूकंपाचे केंद्र कोलंबियाच्या चोको प्रांतातील संजोस डेल पाल्मारजवळ भूगर्भात १०७ किमी खोल होते. प्राथमिक माहितीनुसार, भूकंपाचा सर्वाधिक फटका बसलेल्या पेरेरा शहरात १८ जणांचा मृत्यू झाला आहे. मानिझालेस या शहरात २ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती महापौर जॉर्ज एड्युआर्डो यांनी दिली आहे.

कोलंबियातील प्रमुख शहरांपैकी एक असलेल्या कॅली शहरात सुमारे २० पेक्षा जास्त इमारती कोसळल्या असून अनेक लोक ढिगाऱ्याखाली अडकले आहेत.

भूकंपाचे धक्के कोलंबियाची राजधानी बोगोटासह शेजारील देश इक्वेडोर, पनामा आणि व्हेनेझुएलाच्या सीमावर्ती भागातही तीव्रतेने जाणवले. बोगोटा शहरात सायरन वाजताच लोक घाबरून घरातून रस्त्यावर पळाले. सुरक्षेचा उपाय म्हणून पश्चिमेकडील सुमारे ६ लहान विमानतळांवरील विमान वाहतूक तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे.कोलंबियाचे अध्यक्ष अबेलार्दो डी ला एस्प्रिएला यांनी भूकंपग्रस्त भागाचा दौरा करण्याची घोषणा केली आहे. चोको प्रांताच्या राज्यपाल नुबिया कॅरोलिना कोडोर्बा-कुरी यांनी संभाव्य भूकंपाच्या दुय्यम धक्क्यांचा इशारा दिला आहे. सध्या आपत्कालीन बचाव पथके आणि ड्रोनच्या साहाय्याने ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांचा शोध घेतला जात आहे.

# शहीद हरिदास कापसे अनंतात विलीन

**दै. सिंहवाणी वृत्त, बुलढाणा**

उत्तराखंडमध्ये कर्तव्य बजावताना वीरमरण आलेले चिखलीचे सुपुत्र हवालदार हरिदास मधुकर कापसे (वय ३६) यांच्यावर आज सोमवारी चिखली येथील तालुका क्रीडा संकुलाच्या मैदानावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. भारतीय सैन्य दलातील ४२१ पॅरा फिल्ड कंपनी मध्ये ते कार्यरत होते.

वीर जवानाला अखेरचा निरोप देण्यासाठी चिखली शहरासह तालुक्यातील देशप्रेमी मोठ्या संख्येने अंत्ययात्रेत सहभागी झाले. शहीद जवान अमर रहे, भारत माता की जय, अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. या भावविवश वातावरणात हजारो नागरिकांच्या उपस्थितीत हरिदास कापसे पंचतत्त्वात विलीन झाले.



आज त्यांचे पार्थिव चिखलीत दाखल झाल्यानंतर दांडगे ले आऊट येथील त्यांच्या निवासस्थानापासून अंतिम यात्रेला सुरुवात झाली.ही अंतिम यात्रा सिद्ध सायन्स चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बसस्थानक मार्गे तालुका क्रीडा संकुलाच्या मैदानावर पोहोचली. मार्गाच्या दुतर्फा नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. आपल्या शहरातील सुपुत्राला अखेरचा निरोप देण्यासाठी आबालवृद्ध रस्त्याच्या दुतर्फा उभे होते. अंतिम यात्रेदरम्यान शहीद जवान हरिदास कापसे अमर रहे।, भारत माता की जय। अशा घोषणांनी चिखलीचा आसमंत निनादून गेला. देशासाठी कर्तव्य बजावताना प्राणांची आहुती देणाऱ्या वीर जवानाला निरोप देताना उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू होते. प्रत्येकाचे डोळे पाणावले होते.

हजारो नागरिकांनी वीर जवानाचे अंतिम दर्शन घेत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. या अत्यसंस्काराला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. आमदार श्वेताताई महाले, आमदार संजय गायकवाड, चिखलीचे नगराध्यक्ष पंडितदेशमुख यांच्यासह जिल्हा प्रशासनातील अधिकारी, पोलीस अधिकारी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ६ खासदारांच्या विलिनिकरणाबाबतची सुनावणी लांबली

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

जून महिन्यात घडलेल्या नाट्यमय घडामोडींनंतर उद्धवसेनेतील सहा खासदारांचा एक गट फुटून शिंदेसेनेत विलीन झाला होता. तसेच या सहा खासदारांच्या विलिनीकरणाला लोकसभा अध्यक्षांनीही मान्यता दिली होती. मात्र या निर्णयाविरोधात उद्धवसेनेने सर्वोच्च न्यायालयात धाव घेत दाद मागितली होती. उद्धवसेनेच्या या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायलयात महत्त्वपूर्ण सुनावणी झाली असून आजच्या सुनावणीवेळी लोकसभा अध्यक्ष आणि इतर खासदारांनी आपली बाजू मांडण्यासाठी आणखी वेळ वाढवून मागितल्याने आता ही सुनावणी दोन आठवड्यांनी पुढे ढकलण्यात आली आहे.



उद्धवसेनेच्या सहा खासदारांचे शिंदेसेनेतील विलिनीकरण रद्द करण्यात यावे या मागणीसाठी उद्धवसेनेचे खासदार अरविंद सावंत यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज न्यायमूर्ती पी. एस. नरसिम्हा आणि न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. या सुनावणीवेळी लोकसभा अध्यक्ष आणि काही खासदारांनी आपली बाजू मांडण्यासाठी वेळ वाढवून मागितली. या प्रकरणी झालेल्या आधीच्या सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाने लोकसभा अध्यक्ष आणि संबंधित सहा खासदारांना आपली बाजू मांडण्यासाठी नोटिस बजावली होती. मात्र लोकसभा अध्यक्षांनी आपले म्हणणे अद्याप सर्वोच्च न्यायालयासमोर मांडलेले नाही. दरम्यान, लोकसभा अध्यक्ष आणि काही खासदारांनी वेळ वाढवून मागितल्यानंतर न्यायमूर्तींनी या प्रकरणाची सुनावणी दोन आठवडे पुढे ढकलली आहे.

संपादकीय लेखणीतून...

## मोबाईलने बालपण हिरावून, मानवी दिनचर्येवर प्रहार

आपण म्हणतो बालपण देगा देवा! परंतु आज आपले बालपण मोबाईल हिरावून घेत आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. स्मार्टफोन दिवसेंदिवस छोट्या-छोट्या बालकांसाठी व युवावर्गांसाठी घातक सिद्ध होत.त्याचप्रमाणे शाळांमध्ये सुध्दा विद्यार्थीवर्ग मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे व यांचे दुष्परिणाम हळूहळू सामोर येतांना दिसत आहे.एक वर्षांवरील मुलं रडतात म्हणून आई-वडील मुलांच्या हातात मोबाईल देवुन आपली सुटका करून घेतात. याचेही दुष्परिणाम हळूहळू समोर येतांना दिसत आहे. ही परिस्थिती फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळते. यामुळे जगातील संपूर्ण शाळांनी मोबाईलवर बंदी आणावी असा सुचक सल्ला युनेस्कोने दिला आहे. देशासह जगात डिजिटल क्रांती झाली अवश्य परंतु त्याचा गैरवापर विद्यार्थांच्या व युवकांच्या अंगाशी येतांना दिसत आहे.सोबतच बालवयात आई-वडील मुलांना मोबाइलच्या आहारी टाकतांना दिसतात. स्मार्टफोनमुळे सामाजिक, व्यवहारीक व इतर क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसुन येते. आज मोबाईलच्या अतिवापरामुळे कोणीही कोणासोबत समक्ष बोलायला तयार नाही,घरात सर्वसाधारण चर्चा करायला तयार नाही, कोणत्याही गोष्टीची बोलण्यातून देवाणघेवाण किंवा आदानप्रदान होत नाही कारण एक वर्षांच्या मुलांपासून ते मोठ्या पर्यंत सर्वच घंटो-न-घंटे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. पालक आपल्या जबाबदारीपासुन पळ काढण्यासाठी व अतिलाडामुळे चिमुकले सुध्दा मोबाईलच्या आहारी गेले आहेत. यामुळे मानसिक आजार वाढण्याची दाट शक्यता आहे आणि वाढत आहे. मोबाईलच्या गेममध्ये युवावर्ग दिवसेंदिवस फसतांना दिसत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे भारतात युवावर्ग मोठ्या प्रमाणात मोबाईलच्या आदिन झालेले आहेत. यामुळे त्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो आहे.

शिक्षण क्षेत्रातील डिजिटल क्रांती विद्यार्थांसाठी चिंताजनक असल्याचे मत युनेस्कोच्या अहवालातून समोर आले आहे. मोबाईलचा अतिरिक्त वापर झाल्याने शैक्षणिक कामगिरी मंदावते. स्क्रीन टाईम वाढल्याने मुलांच्या भावनिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होतो.परिणामी, मुले चिडचिडे व रागीट बनतात असेही युनेस्कोने म्हटले आहे. यामुळे मुलांमधील फिजिकल एक्टिविटी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी होतांना दिसत आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे. देशात ७४ टक्के मुले (११ ते १७ वयोगटातील) रोज ३० मिनीटेही मैदानी खेळ खेळत नाही. त्याचप्रमाणे १६ ते ३४ वयोगटातील ५९ टक्के लोक ऑनलाईन खेळ ३-३ तास खेळण्यात मग्न असतात. म्हणजेच आजची युवा पिढी मोबाईलच्या खेळांमध्ये (गेममध्ये) किंवा सिरीयल पहाण्यात मोठ्या प्रमाणात मग्न असल्याचे स्पष्ट दिसून येते.यामुळे शरीराला आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा व्यायाम मिळत नाही.डब्लुएचओच्या रिपोर्ट नुसार भारतात ११ ते १७ वयोगटातील ७४ टक्के मुले फिजीकल एक्टिव्ह नसल्याचे सांगितले जात आहे. म्हणजेच एका आठवड्यात मुलं १५० मिनिटसुध्दा खेळत नाही किंवा शारीरिक हालचाली ज्या पध्दतीने पाहिजेत त्या पध्दतीने दिसून येत नाही.

यावरून स्पष्ट होते की आजचा विद्यार्थीवर्ग व युवावर्ग दिवसेंदिवस डोक्यानी कीतीही हुशार असेल परंतु शारीरिक दृष्ट्या दिवसेंदिवस खालावत असल्याचे दिसून येते. देशातील ४१ टक्के लोक मोबाईलच्या नादामुळे शारीरिक व्यायामाच्या दृष्टीकोनातून एक्टिव नसल्याचे दिसून येते.म्हणजे आज बालपणापासुन तर युवा वर्गापर्यंत आणि युवावगार्पासुन तर वयस्कर लोकांना सुद्धा मोबाईलने चांगलेच जखडल्याचे आपण पहातो.यामुळे शरिराला ज्या पध्दतीने आणि ज्याप्रमाणात व्यायामाची आवश्यकता आणि गरज आहे तो मिळत नसल्याने अनेक व्याधी किंवा आजार बालकांमध्ये, युवावर्गामध्ये व अन्य लोकांमध्ये दिसून येते व यांचा परिणाम आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे. आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोबाईल शिवाय जिवन अधुरे असल्याचे सर्वांना वाटते. परंतु मोबाईलचा वापर दिवसेंदिवस मानवाच्या दृष्टीकोनातून अत्यंत घातक सिद्ध होत आहे हेही तितकेच सत्य आहे याला कोणीही नाकारू शकत नाही.म्हणजेच मोबाईलचा अती वापर जीव घेणा सीध्द होवू शकते यालाही नाकारता येत नाही. मानवाच्या मेंदूला (मस्तिष्कला) रक्तपुरवठा व्यवस्थित आणि सुरळीत झाला नाही तर (स्ट्रोक)होण्याचे मोठे कारण ठरू शकते.

# परकीय निधी नियंत्रण विधेयक आणण्याची गरज का?

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

परकीय योगदान नियमन कायदा दुरुस्ती विधेयक आणण्यामागचा मुख्य उद्देश परदेशी निधीच्या वापरात पारदर्शकता वाढवणे, राष्ट्रीय सुरक्षा मजबूत करणे आणि जुन्या कायद्यातील प्रशासकीय त्रुटी दूर करणे हा आहे. ज्या संस्थांची नोंदणी रद्द झाली आहे किंवा ज्यांचे परवाना नूतनीकरण झाले नाही, त्यांच्याकडील परदेशी निधी आणि मालमत्तेची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी हे कायदेशीर नियंत्रण आवश्यक मानले जाते.

परवाना संपलेल्या किंवा रद्द झालेल्या एनजीओ मधील परदेशी निधीच्या संपत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक 'नियुक्त प्राधिकरण' तयार करणे हा या कायद्याचा उद्देश आहे. परदेशी निधीचा वापर देशाच्या सुरक्षेला किंवा सार्वभौमत्वाला बाधक ठरणाऱ्या कामांसाठी होऊ नये म्हणून कडक देखरेख ठेवणे हा उद्देश या कायद्याचा आहे. भारताची संप्रभुता आणि लोकशाही प्रक्रियेवर कोणत्याही परकीय शक्तीचा अनुचित प्रभाव पडू नये, यासाठी हे नियंत्रण आवश्यक मानले जाते.

जुन्या कायद्यातील अस्पष्टता संपवून प्रशासकीय आणि अनुपालन प्रक्रिया अधिक मजबूत करणे आणि संस्थांना मिळणारा परदेशी निधी आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या मालमत्तांचा अचूक हिशोब ठेवणे.असा व्यापक उद्देश हा कायदा आणण्याचा मागचा उद्देश आहे.

पूर्वीच्या कायद्यात एखादी संस्था किंवा एन जी ओ चा परवाना रद्द, कालबाह्य किंवा समर्पित झाल्यास, त्यांच्याकडे असलेल्या अब्जावधी रुपयांच्या परदेशी निधीचे आणि मालमत्तेचे काय करायचे, याबद्दल स्पष्ट नियम नव्हते.नवीन दुरुस्तीनुसार, अशा मालमत्तेच्या व्यवस्थापन आणि विल्हेवाटीसाठी एक 'नियुक्त प्राधिकरण' स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

परकीय योगदान (नियमन) कायदा दुरुस्ती विधेयक अंमलात आणण्याचा उद्देश देशाच्या सुरक्षिततेशी व राष्ट्रहिताशी निगडित असताना देखील विरोधी पक्ष या विधेयकाला विरोध करत आहे.विरोधाचे मुख्य कारण म्हणजे यामुळे सरकारला नोंदणी रद्द झालेल्या किंवा नूतनीकरण न झालेल्या स्वयंसेवी संस्थांच्या मालमत्तांवर नियंत्रण ठेवण्याचे व त्या ताब्यात घेण्याचे असीमित अधिकार मिळतात. जर एखाद्या संस्थेचे एफसीआरए प्रमाणपत्र रद्द झाले किंवा नूतनीकरण झाले नाही, तर परदेशी निधीतून उभी राहिलेली मालमत्ता सरकार नियुक्त केलेल्या प्राधिकाऱ्याकडे जाईल. यामुळे मानवाधिकार, वकिली आणि सामाजिक कार्य करणाऱ्या बिगर-सरकारी संस्थांवर राज्याचा अंकुश वाढेल आणि त्यांची स्वायत्तता धोक्यात येईल, असा आरोप समीक्षक करतात.

**अल्पसंख्याक व धार्मिक संस्थांच्या चिंताधार्मिक संस्थांवर परिणामः**

ख्रिश्चन आणि इतर अल्पसंख्याक धार्मिक संस्थांना भीती आहे की चर्च, शाळा, तसेच हॉस्पिटल्स चालवणाऱ्या त्यांच्या धमार्दाय संस्थांना या नियमांमुळे लक्ष्य केले जाऊ शकते. घटनात्मक अधिकारांचे उल्लंघनः या तरतुदी धार्मिक स्वातंत्र्य आणि मालमत्तेच्या अधिकाराशी संबंधित घटनात्मक कलमांच्या (कलम १४, २५, २६ आणि ३००अ) विरोधात असल्याचा आक्षेप घेतला जात आहे.

**राजकीय आणि आंतरराष्ट्रीय वादराजकीय विरोधः**

काँग्रेस आणि डाव्या पक्षांसह विरोधी पक्षांचा दावा आहे की, हे विधेयक विरोधी विचारसरणीच्या किंवा सरकारवर टीका करणाऱ्या एनजीओंचा आवाज दाबण्यासाठी एक राजकीय शस्त्र म्हणून वापरले जाऊ शकते.

**परदेशी टीकाः**

अमेरिकेसह काही बाह्य घटकांनी यावर आक्षेप घेत, हे धार्मिक अल्पसंख्याकांच्या संस्थांवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. मात्र, भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने हे देशांतर्गत कायदेविषयक प्रकरण असल्याचे स्पष्ट करत हा भारताचा अंतर्गत प्रश्न असल्याचे म्हटले आहे.

**सरकारची भूमिका काय आहे?**

दुसरीकडे, केंद्र सरकारचे म्हणणे आहे की हे विधेयक परदेशी निधी थांबवण्यासाठी नसून, त्यामध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आणण्यासाठी आहे. परदेशी पैशांचा गैरवापर, बेकायदेशीर कारवाया किंवा अंतर्गत सुरक्षेला बाधा आणणाऱ्या कामांसाठी होऊ नये, हा यामागील मुख्य उद्देश आहे. तसेच, पूजेच्या ठिकाणांचे धार्मिक स्वरूप अबाधित राखले जाईल, अशी हमीही सरकारने विधेयकात दिली आहे.

परकीय योगदान नियमन कायदा दुरुस्ती विधेयक, २०२६ आणि नवीन नियमांमुळे परदेशी निधी मिळवणाऱ्या धार्मिक संस्थांवर थेट प्रभाव पडणार आहे. केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे केवळ धार्मिकच नव्हे, तर सर्वच स्वयंसेवी संस्थांच्या परदेशी निधीवर सरकारी नियंत्रण वाढले आहे,या निधीचा वापर विधायक कामासाठी करता येणार आहे मात्र धर्मांतर किंवा प्रचार' या कामांसाठी परदेशी निधी वापरण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. थोडक्यात सांगायचे तर, हा कायदा थेट धर्मावर बंदी घालत नाही, परंतु परदेशी निधीच्या बळावर चालणाऱ्या धार्मिक उपक्रमांवर आणि संस्थांच्या मालमत्तेवर सरकारचे नियंत्रण अत्यंत कडक करतो.

- ९५६१५९४३०६

# अन्यायाला अखेर पूर्णविरामः सर्फराज खानचा भारतीय संघात पुन्हा प्रवेश

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

भारतीय क्रिकेटमध्ये प्रतिभा असणे एक वेळ सोपे मानले जाते, पण संधी मिळवणे आणि मिळालेला हक्क टिकवून ठेवणे ही एक मोठी लढाई असते. गेल्या काही काळापासून रणजी करंडक आणि देशांतर्गत स्पर्धांमध्ये धावांचा डोंगर उभा करूनही, तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःला सिद्ध करूनही सरफराज खानला भारतीय संघाच्या बाहेर राहावे लागले होते. मुंबईच्या या धडाकेबाज फलंदाजावर सातत्याने अन्याय होत असल्याची भावना क्रिकेटप्रेमींमध्ये आणि जाणकारांमध्ये प्रबळ होती. मात्र, नियती आणि कौशल्याच्या बळावर अखेर सर्फराज खानचा भारतीय संघात पुनरागमन झाले आहे. श्रीलंकेविरुद्ध १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी दुखापतग्रस्त साई सुदर्शनच्या जागी सर्फराजचा १५ जणांच्या संघात समावेश करण्यात आला आहे.

**धावांचा डोंगर, १५० धावांची खेळी आणि तरीही उपेक्षा**

सर्फराज खानचा आतापर्यंतचा प्रवास अत्यंत संघर्षाचा राहिला आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये ८० पेक्षा जास्त सरासरीने धावा काढणाऱ्या या फलंदाजाला भारतीय संघाची कॅप मिळवण्यासाठी अनेक वर्षे वाट पाहावी लागली. संधी मिळाल्यावर त्याने भारतासाठी खेळलेल्या ६ कसोटी सामन्यांमध्ये आपली उपयुक्तता सिद्ध केली. २०२४ मध्ये मुंबईत न्यूझीलंडविरुद्ध झालेल्या कसोटी सामन्यात त्याने केलेली १५० धावांची दणदणीत खेळी ही त्याच्यातील अफाट क्षमतेची साक्ष होती.

तरीही, बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये संघासोबत असूनही त्याला अंतिम ११ खेळाडूंमध्ये संधी मिळाली नाही आणि त्यानंतर त्याला थेट संघाबाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. न्यूझीलंडविरुद्ध शतक ठोकणारा फलंदाज एकाएकी संघातून गायब कसा होतो, असा प्रश्न सातत्याने विचारला जात होता.

**साई सुदर्शनची दुखापत अन् सर्फराजसाठी उघडलेले दार**

श्रीलंका 'अ' संघाविरुद्धच्या सामन्यात साई सुदर्शनच्या पायाच्या बोटाला झालेली दुखापत गंभीर ठरली. बंगळूरु येथील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई) मध्ये उपचार घेत असलेला सुदर्शन पूर्णपणे बरा न झाल्याने त्याला मालिकेतून वगळावे लागले. ही परिस्थिती सर्फराजसाठी संधीचे दार उघडणारी ठरली. निवड समितीने त्याच्या अनुभवावर आणि गुणवत्तेवर विश्वास दाखवत त्याला पुन्हा पाचारण केले. १५ ऑगस्टला गॉल येथे होणाऱ्या पहिल्या कसोटीपूर्वी तो कोलंबोमध्ये भारतीय संघात सामील होईल.

**संघ पुनरागमन झाले, पण अंतिम ११ मधील संघर्ष बाकीच!**

सर्फराजचे संघात पुनरागमन झाले असले, तरी त्याला अंतिम ११ मध्ये स्थान मिळणे सोपे नाही. साई सुदर्शनच्या अनुपस्थितीत तिसऱ्या क्रमांकाच्या जागेसाठी देवदत्त पडिक्कलने आपला दावा भक्कम केला आहे. सराव सामन्यात पडिक्कलने ठोकलेली नाबाद १४२ धावांची खेळी आणि रणजी मोसमातील ५३० हून अधिक धावांचा धडाका यामुळे व्यवस्थापनाचा कल पडिक्कलकडे असण्याची शक्यता जास्त आहे.

**सर्फराजची खरी परीक्षा**

सर्फराज खान हा केवळ एक फलंदाज नाही, तर देशांतर्गत क्रिकेटमधील अपार संघषार्चे प्रतीक आहे. संघात परतणे ही या अन्यायाविरुद्धच्या लढाईतील पहिली पायरी आहे. आता जर त्याला खेळण्याची संधी मिळाली, तर पुन्हा एकदा आपल्या बॅटनेच सर्व टीकेला आणि उपेक्षेला सडेतोड उत्तर द्यावे लागेल.

**भारताचा अद्ययावत संघः**

शुभमन गिल (कर्णधार) ,केएल राहुल (उपकर्णधार), यशस्वी जयस्वाल, रिषभ पंत (यष्टीरक्षक), ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, मानव सुथार, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, देवदत्त पडिक्कल, गुरनूर ब्रार, आकिब नबी व सरफराज खान.

- ९०९६३७२०८२

# हाच संवाद मोहनजी भागवतांनी आंदोलनाच्या एक-दोन दिवसांआधी साधला असता तर, कदाचित सरकारला जाग आली असती!

रमेश लांजेवार
नागपूर



सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी जेन-झी सोबत संवाद साधला याचे स्वागत, हेच काम सरकारने वेळेच्या आधी विद्यार्थ्यांसोबत केले असते तर जेन-झीला एवढ्या जखमा झाल्या नसत्या. मोहन भागवतांनी जेन-झीवर विश्वास दाखविला ही चांगली गोष्ट आहे. परंतु प्रधानमंत्री यांना परिसीमन बिलाकरीता बहुमताच्या निमित्ताने पक्ष फोडून एनडीएमध्ये सहभागी झालेल्या खासदारांसोबत चर्चा करण्यास वेळ मिळाली; अशाप्रकारे जेन-झी सोबत वेळेच्या आधीच चर्चा करण्यास वेळ का मिळाली नाही?असे अनेक प्रश्न आज विद्यार्थ्यांसमोर उपस्थित होत आहेत. सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी जेन-झीवर पूर्ण विश्वास करत ते म्हणतात की, विद्यार्थ्यांना चांगल्या व्येवस्थेसाठी आंदोलन करण्याचा पूर्ण अधिकार आहे आणि मी त्याचे समर्थन करतो असे जेन-झी सोबत संवाद साधताना त्यांनी म्हटले याचे मनापासून स्वागत.

परंतु कोणताही राजकीय हेतू न बाळगता ज्या विद्यार्थ्यांनी सीजेपीच्या अंतर्गत आपल्या मागण्यांच्या संदर्भात आंदोलन दिनांक २० जूनला सुरू केले ते २० जुलैपर्यंत शांततेत चालले या ३० दिवसांच्या कालावधीत सरकारने विद्यार्थ्यांशी चर्चा का केली नाही? या कालावधीत सरकार शांतपणे चर्चा करू शकले असते.परंतू सरकारने उपोषण कर्त्यांसोबत कोणतीही चर्चा न करता फक्त उघड्या डोळ्यांनी तमाशा पहाण्याचे काम केले आणि २० जुलै २०२६ ला जे व्हायचे नाही ते घडले व लोकशाही प्रणालीवर घणाघाती प्रहार करून लोकशाहीची वाट लावून लाठीचार्ज व बळाचा वापर सरकारने केला. विद्यार्थ्यांचे जंतरमंतरवर शांततेत तब्बल ३० दिवस आंदोलन चालले हे सरकारला किंवा मोहनजी भागवतांना त्यावेळी का दिसले नाही! असाही प्रश्न उपस्थित होतो.

सरकारने आंदोलनादरम्यान एक-दोन दिवसांत विद्यार्थ्यांसोबत चर्चा का केली नाही? आणि तोडगा का काढला नाही? असे अनेक प्रश्न आजही उपस्थित होत आहे. सोनम वांगचूक यांचे २५ दिवस उपोषण चालले व २६ व्या दिवशी विद्यार्थ्यांच्या आग्रहाखातर उपोषण सोडले.परंतु आंदोलनादरम्यान एक-दोन दिवसांत सरकारने चर्चा केली असती तर कदाचित उपोषण करण्याची गरज भासली नसती व विद्यार्थ्यांना ३५ दिवस आंदोलन करावे लागले नसते व आंदोलनाला हिंसेचे गालबोट लागले नसते. परंतु सरकार तब्बल ३५ दिवस जंतरमंतरच्या आंदोलनाचा उघड्या डोळ्यांनी तमाशा पहात रहाली आणि या आंदोलनाला हिंसक वळण आले व अनेक विद्यार्थी व सुरक्षा कर्मचारी मोठ्या प्रमाणात गंभीर जखमी झाले याला जबाबदार कोण याचाही विचार सरकारने करायला हवा.सरकार परिसीमन बिल मंजूर करण्यासाठी संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करीत आहेत. या अनुषंगाने गुरूवार दिनांक ६ ऑगस्टला शिवसेना (उबाठा) पक्षातून शिवसेनेत आलेल्या सहा खासदारांसह तृणमूल काँग्रेसमधून बाहेर पडून "नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया"या पक्षात गेलेल्या २० हून अधिक संसद सदस्यांसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नाश्त्याच्या निमित्ताने चर्चा केली.या बैठकीला एनडीएचे ४ हून अधिक खासदार उपस्थित होते.सोबतच अनेक मंत्री सुध्दा उपस्थित होते. या चर्चेदरम्यान पंतप्रधानांनी एनडीएमध्ये प्रवेश करणाऱ्या खासदारांना आश्वस्त केले की, चिंता करू नका, मी तुमच्या पाठीशी आहे याचेही स्वागत! अशाच पध्दतीने सरकार किंवा पंतप्रधान किंवा इतर मंत्री यांनी जंतरमंतरवर जाऊन विद्यार्थ्यांसोबत (जेन-झी सोबत) आंदोलनादरम्यान एक-दोन दिवसांत सरकारच्या वतीने चर्चा केली असती आणि "चिंता करू नका मी तुमच्या पाठीशी आहे"असे म्हटले असते तर कदाचित आंदोलन शांततेत पार पडले असते व सहज मार्ग निघाला असता.

परंतु सरकारने किंवा सरकारमधील मंत्र्यांनी विद्यार्थ्यांसोबत चर्चा करण्याला थोडेसेही महत्त्व दिले नाही व वर्चस्वाची लढाई समजून चर्चेसाठी टाळाटाळ केली आणि "हम करे सो कायदा" अशी रणनीती दिसायला लागली. परंतु स्वतःच्या स्वार्थासाठी इतर पक्षांतील फुटुन आलेल्या खासदारांनसोबत वेळेतूनवेळ काढून नाश्त्याच्या निमित्ताने पंतप्रधानांनी एनडीएमध्ये प्रवेश करणाऱ्या खासदारांसोबत चर्चा केली व त्यांना सांगितले की, "चिंता करू नका मी तुमच्या पाठीशी आहे".

हेच वाक्य किंवा अशीच चर्चा माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांसोबत (जेन-झी सोबत) केली असती तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असता व लाठीचार्ज झालाच नसता. या संपूर्ण घटनाक्रमावरून लक्षात येते की, सरकारला सत्तेचे घमंड आले असावेत.परंतु सरकार आता म्हणते की,आम्ही विद्यार्थ्यांसोबत आहोत ही गोष्ट अगोदर झाली असती तर विद्यार्थ्यांच्या जखमेवर फुंकर घातल्या सारखे झाले असते. परंतु सरकारने प्रथम बळाचा वापर केला आणि आता आम्ही जेन-झी सोबत आहोत असे म्हणतात हे कितपत योग्य म्हणावे ही बाब देशाच्या १४५ कोटी जनतेला हळूहळू लक्षात येत आहे.

माझ्यामते सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी जेन-झी सोबत संवाद साधण्यास खूप उशीर केला असावा. हाच संवाद भागवतांनी आंदोलनाच्या एक-दोन दिवसांच्या काळात साधला असता तर कदाचित सरकारला जाग आली असती व विद्यार्थ्यांसोबत चर्चा करता आली असती.

सरसंघचालक देशहिताचेच मुद्दे मांडतात यात दुमत नाही.परंतु सरकार त्यांच्या मुद्यांना कितपत मानतात हाही विचारांचा प्रश्न आहे. भागवत म्हणतात की, शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद केली पाहिजे आणि शिक्षण हा धंदा नाही. ही बाब बरोबर आहे.परंतु सध्याच्या परिस्थितीत देशात शिक्षण हा फक्त धंदा बनल्याचे दिसून येते. त्यामुळेच देशात पेपर फुटीसारखे गैरप्रकार दिसून येतात. कारण जोपर्यंत आमदार-खासदार,मंत्री, उच्चपदस्थ अधिकारी, राजकीय पुढारी आपल्या मुलामुलींना सरकारी शाळा-महाविद्यालये दाखल करीत नाहीत तोपर्यंत शिक्षण प्रणालीत सुधारणा शक्य नाही. जी कंगना राणावत "जेन-झीला जनरेशन गटार आहे"म्हणाली होती ती आज जेन-झी ला भारताची सर्वात मोठी ताकद व संस्कृतीची मोठी ओळख असल्याचे सांगत आहेत. म्हणजे पहिले गटार म्हणायचे आणि आता चांगले म्हणायचे ही कसली लोकप्रतिनिधी म्हणावी! कंगना राणावतने आता लोकप्रतिनिधी पदाचा त्याग केला पाहिजे व चित्रपटांमध्ये काम करायला पाहिजे. जय हिंद!

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# पोलीस आयुक्त विश्वास नांगरे खापरखेड्याला भेट देणार

## अवैध धंदे व गँगवार प्रकरणात कठोर कारवाईचे आश्वासन, नागरिकांशी संवाद साधणार



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा-श्रीकांत जालंधर**

येथील मुख्य बाजारपेठेत २ ऑगस्ट रोजी दगडी चाळ टोळीने घडवून आणलेल्या रक्तरंजित गँगवार आणि प्राणघातक हल्ल्याच्या घटनेने संपूर्ण खापरखेडा परिसर हादरला या हल्ल्यात तीन जण गंभीर जखमी झाले असून या घटनेचे तीव्र पडसाद राजकीय वतुर्ळात उमटले आहेत या पार्श्वभूमीवर नागपूरचे शहर पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील येत्या एक-दोन दिवसांत खापरखेडा पोलीस ठाण्याला भेट देऊन स्थानिक नागरिकांशी थेट संवाद साधणार आहे. यावेळी खापरखेडा येथील सर्व पक्षीय राजकीय शिष्टमंडळाला दगडी चाळ गँगवार प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

सोमवार, १० ऑगस्ट रोजी शहर पोलीस आयुक्त कार्यालयात राज्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत खापरखेडा येथील सर्वपक्षीय शिष्टमंडळाने पोलीस आयुक्तांची भेट घेऊन मुख्य बाजारपेठेतील दगडी चाळ गँगवार, परिसरात सुरू असलेले अवैध धंदे व एमडीचा मुद्दा उपस्थित केला.

यापूर्वी ९ ऑगस्ट रोजी कोराडी येथे आयोजित पालकमंत्र्यांच्या जनता दरबारातही गँगवार प्रकरणाचा मुद्दा गाजला होता पालकमंत्र्यांनी गंभीर दखल घेत पोलीस आयुक्तांना गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. सोमवार १० ऑगस्टला पार पडलेल्या बैठकीत पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी स्वतः खापरखेड्याला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेण्याचे व नागरिकांशी संवाद साधण्याचे आश्वासन दिले.

बैठकीला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, विधान परिषद आमदार डॉ. राजीव पोतदार, माजी आमदार सुधाकर कोहळे, जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी व शिष्टमंडळाचे सदस्य उपस्थित होते.

खापरखेडा मुख्य बाजारपेठेतील या रक्तरंजित घटनेनंतर सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, खापरखेडा परिसरात तीव्र संतापाची लाट पसरली आहे. घटनेला १० दिवस होत आहेत तरी सुद्धा गँगवार प्रकरणातील मुख्य सूत्रधारासह डझनाहून अधिक आरोपी पसार आहेत.

### ठाणेदाराला सक्तीच्या रजेवर पाठवा!

#### खापरखेडा पोलिसांच्या भूमिकेवर कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह

खापरखेडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर आणि गुन्हेगारांचे लागेबांधे असल्याचा आरोप होतो आहे. दगडी चाळ टोळीचा मुख्य सूत्रधार सूरज कावळे आणि शुभम उर्फ शेरू उईके हे तडीपार असतानाही नुकत्याच झालेल्या कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान ताब्यात घेतलेल्या कुख्यात सूरज कावळे रेकार्डवर असतांना पोलिसांनी सुचनापत्र देऊन सोडून दिल्याचा आरोप आहे. शिवाय पोलीस ठाण्यात सराईत गुन्हेगारांना बसायला खुर्ची दिल्या जात असल्याचा आरोप स्थानिकांचा आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर यांचे दगडी चाळ टोळीशी संबंध असल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे त्यामूळे दगडी चाळ गँगवार प्रकरणाचा पारदर्शक तपास होने अपेक्षित आहे त्यामूळे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# सुधीर पारवे यांचा १० हजार वृक्षलागवडीचा संकल्प



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत उमरेड विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार सुधीर पारवे यांनी विविध गावांत १० हजार झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमांतर्गत सोमवारी (१० ऑगस्ट) तालुक्यातील टाका, धापर्ला (डोये), जवळी आणि तातोली येथे ५०० वृक्षांची लागवड करण्यात आली. सुधीर पारवे फाउंडेशन व लक्ष्मणा बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. 'एक पेड, माँ के नाम' या संकल्पनेतून गावातील प्रमुख मार्गावर वृक्षदिंडी काढण्यात आली. त्यानंतर विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

या उपक्रमाला ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी, शिक्षक, ग्रामपंचायत पदाधिकारी, आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका तसेच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पर्यावरण संवर्धनासाठी केवळ वृक्षलागवड न करता लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाला माजी आमदार सुधीर पारवे, सुधाकर पडोळे, त्र्यंबक उमक, बंडूजी राऊत, नितेश राऊत, प्रमोद डोये, प्रफुल मसराम, नितेश अमडारे, किसन बडवाईक, अरविंद चौधरी, मनोज ढगे, सुयोग पंचाळ, मनोज चव्हाण, विजय चौधरी यांच्यासह धापर्ला येथील सरपंच कुंभरे, राजेश कानफाडे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# कोतवालांप्रमाणे पोलीस पाटलांनाही शासकीय सेवेत संधी द्या!

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पोलीस पाटलांचे निवेदन, लवकरच बैठक घेण्याचे आश्वासन

**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

कोतवालांना तलाठी भरतीमध्ये २० टक्के आरक्षण देण्याच्या प्रस्तावाच्या पार्श्वभूमीवर पोलीस पाटलांनाही त्यांच्या शैक्षणिक पात्रता व सेवाकालीन अनुभवाच्या आधारे शासकीय सेवेत विशेष संधी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात पोलीस पाटील रूपाली लांडे व शालिनी गजभिये यांनी महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन दिले.

यावेळी भूमिका हुमणे, स्नेहलता साठवणे, नीतिमा गजभिये, सविता गजभिये, मनिषा वैरागडे, नंदिनी फुकट, शिल्पा ढोणे, आरती गभणे, सुवर्णा सेबे, रूपाली पिकलमुंडे, शरद लांबट, गुलशन मेश्राम, प्रशांत वाडीभस्मे, युवराज गाढवे, संदीप पत्रे, मनोज चौधरी, मंगेश मोटघरे आदी पोलिस पाटील उपस्थित होते.

मोहपा येथे आयोजित पोलीस पाटील कार्यशाळेत हे निवेदन देण्यात आले. पोलीस पाटील आस्थापना महसूल विभागाच्या अखत्यारित असून त्यांचे कामकाज मोठ्या प्रमाणावर गृह (पोलीस) विभागाशी संबंधित आहे. त्यामुळे महसूल आणि पोलीस प्रशासनाच्या कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या पोलीस पाटलांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार शासकीय सेवेत संधी देण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

राज्यातील अनेक पोलीस पाटील पदवीधर, पदव्युत्तर तसेच विविध



डिप्लोमा व व्यावसायिक शिक्षण घेतलेले आहेत.

गावपातळीवर कायदा व सुव्यवस्था, पंचनामा, सर्वेक्षण, आपत्ती व्यवस्थापन, निवडणूक प्रक्रिया तसेच विविध प्रशासकीय कामांचा त्यांना अनुभव आहे. त्यामुळे महसूल व गृह विभागातील पात्र पदांच्या भरतीमध्ये त्यांना प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी निवेदनाची दखल घेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या विषयावर लवकरच बैठक आयोजित करून सकारात्मक चर्चा करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याचे पोलीस पाटील प्रतिनिधींनी सांगितले.

पोलीस पाटलांच्या शैक्षणिक पात्रता आणि दीर्घ सेवाकालीन अनुभवाचा शासनाने योग्य उपयोग केल्यास ग्रामीण प्रशासनाला अनुभवी मनुष्यबळ उपलब्ध होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा पोलीस पाटील वर्गातून व्यक्त करण्यात आली.

# १३ लाखांचे शवविच्छेदन गृह डॉक्टरांच्या नकाराने धूळखात!

## शवगृह सहाय्यक नसल्याचे कारण, जलालखेड्यातील सुविधा बंद, मृतांच्या नातेवाईकांना आता नरखेडची ५० किलोमीटरची वारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

जलालखेडा प्राथमिक आरोग्य केंद्रात नागरिकांच्या सोयीसाठी सुमारे १३ लाख रुपये खर्च करून उभारण्यात आलेले शवविच्छेदन गृह डॉक्टरांच्या नकारामुळे वापराविना पडण्याची वेळ आली आहे. शवगृह सहाय्यकाचे पद रिक्त असल्याचे कारण पुढे करीत जलालखेडा येथे शवविच्छेदन करता येणार नसल्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अरविंद मंदारी यांनी पोलीस विभागाला कळविले आहे. त्यामुळे जलालखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मृतांच्या नातेवाईकांना आता शवविच्छेदनासाठी नरखेड येथे जावे लागणार असून, या निर्णयामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

जलालखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुमारे ६० ते ७० गावे येतात. यातील अनेक गावे जलालखेड्यापासून २० ते ३० किलोमीटर अंतरावर आहेत. या परिसरातील मृतदेहांचे शवविच्छेदन यापूर्वी जलालखेडा



प्राथमिक आरोग्य केंद्रातच केले जात होते. त्यामुळे मृतांच्या नातेवाईकांची मोठी गैरसोय टळत होती. मात्र, आता जलालखेडा येथे शवविच्छेदन बंद झाल्यास नातेवाईकांना मृतदेह घेऊन सुमारे ५० किलोमीटर अंतरावरील नरखेड येथे जावे लागणार आहे. त्यामुळे दुःखाच्या प्रसंगी नातेवाईकांची मोठी ससेहोलपट होण्याची शक्यता आहे.

जलालखेडा येथील जुने शवविच्छेदन गृह जीर्ण अवस्थेत होते. त्याठिकाणी वीज व पाण्याची पुरेशी सुविधा नसल्यामुळे शवविच्छेदन करताना अनेक अडचणी निर्माण होत होत्या. ही समस्या लक्षात घेऊन आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या पाठपुराव्यातून शवविच्छेदन गृहासाठी १३ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. त्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात नवीन शवविच्छेदन गृह उभारण्यात आले. लाखो रुपये खर्च करून नवीन इमारत व सुविधा उभारण्यात आल्यानंतरही तेथे शवविच्छेदनच होणार नसेल, तर शासनाचा निधी खर्च करण्याचा उद्देश काय, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

जलालखेडा प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन एमबीबीएस डॉक्टर कार्यरत असल्याचे सांगण्यात येते. मात्र, शवगृह सहाय्यकाचे पद रिक्त असल्याने शवविच्छेदन करता येणार नसल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. याबाबत वरिष्ठांकडून पत्र प्राप्त झाल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, शवगृह सहाय्यकाचे पद यापूर्वीही रिक्त होते, तर आतापर्यंत जलालखेडा येथे झालेली शवविच्छेदने कोणत्या व्यवस्थेत आणि कोणाच्या परवानगीने करण्यात आली, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकरणाची वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांनी चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी डॉ. अमोल देशमुख यांनी जलालखेडा प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन तेथील आरोग्य सुविधांची पाहणी केली होती. प्राथमिक आरोग्य केंद्रातील भौतिक सुविधांबाबत त्यांनी संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना जाब विचारल्याची चर्चा आहे. त्यानंतर शवविच्छेदनाची सुविधा बंद करण्यात आल्याने या दोन्ही घटनांचा काही संबंध आहे का, अशी चर्चा परिसरात सुरू झाली आहे. मात्र, याबाबत कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.

शवविच्छेदनासाठी आता नरखेडला जावे लागल्याने सर्वाधिक फटका गरीब आणि सर्वसामान्य कुटुंबांना बसणार आहे. मृत्यूच्या दुःखातून सावरत असतानाच मृतदेह घेऊन लांबचा प्रवास करावा लागणार असल्याने नातेवाईकांवर आर्थिक तसेच मानसिक ताण वाढणार आहे. जलालखेडा परिसरातील नागरिकांची गैरसोय लक्षात घेता शवगृह सहाय्यकाचे रिक्त पद तातडीने भरावे किंवा तोपर्यंत पयार्यी मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे आणि जलालखेडा येथे शवविच्छेदनाची सुविधा पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी होत आहे.

जलालखेडा येथे शवगृह सहाय्यक नसल्याचे कारण देत शवविच्छेदन बंद करणे दुर्दैवी आहे. परिसरातील नागरिक २० ते ३० किलोमीटर अंतरावरून शवविच्छेदनासाठी जलालखेडा येथे येतात. आता ५० किलोमीटर दूर नरखेड येथे जावे लागल्यास मृतांच्या नातेवाईकांना मोठा त्रास सहन करावा लागणार आहे. या संदर्भात संबंधित विभागाशी चर्चा करून पूर्वीप्रमाणे जलालखेडा येथेच शवविच्छेदन सुरू ठेवण्याची विनंती करणार आहे, असे अतुल पेठे, कार्याध्यक्ष, नरखेड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) यांनी सांगितले.

शासनाने नागरिकांच्या सुविधेसाठी लाखो रुपये खर्च करून उभारलेले शवविच्छेदन गृह प्रत्यक्षात वापरात येत नसेल तर त्याची जबाबदारी निश्चित करण्याची गरज आहे. त्यामुळे वरिष्ठ आरोग्य विभागाने या प्रकरणात तातडीने लक्ष घालून मनुष्यबळ उपलब्ध करून जलालखेडा येथील शवविच्छेदनाची सुविधा सुरू करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

**थोडक्यात**

### मोटार सायकल चोरीतील सराईत आरोपीस जेरबंद, १२ मोटार सायकल जप्त




**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

मौदा शहरातील सार्वजनिक स्थळी ठेवलेल्या मोटार सायकलची वारंवार होत असलेल्या चोरी सत्रामुळे पोलीस स्टेशन मौदा येथे तक्रारी येत असल्याने याबाबत गंभीर दखल घेवुन सारीन दुर्गे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन मौदा यांनी मौदा येथील मोटार सायकल चोरी करणाऱ्या आरोपीचा तात्काळ शोध घेवुन अटक करण्याबाबत डी.बी. पथकास आदेश दिल्याने डी. बी. पथकाने कसोशीने प्रयत्न करुन मौदा शहरात मोटार सायकल चोरी करणारा आरोपी नामे प्रवेश कन्हैया कंगाले, वय ३८ वर्षे, रा. पोलीस लाईन टाकळी, गिट्टीखदान, नागपुर यास शिताफीने अटक करुन आरोपीचे ताब्यातुन पो.स्टे. मौदा हद्दीतून तसेच नागपुर शहर व भंडारा जिल्हा हद्दितुन चोरीस गेलेल्या एकुण १२ मोटार सायकल कि. ५,३५,०००/-रु. च्या जप्त केलेल्या आहेत. नमुद आरोपी हा मोटार सायकल चोरीतील सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरुद्ध नागपुर शहर, नागपुर ग्रामीण तसेच भंडारा जिल्ह्यात मोटार सायकल चोरी संबंधी विविध पो.स्टे.ला गुन्ह्यांची नोंद आहे.

सदर कारवाई हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक सा. ना.ग्रा., अनिल मस्के, अपर पोलीस अधिक्षक सा. ना.ग्रा., संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान, यांचे मार्गदर्शणात सारीन दुर्गे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे मौदा यांचे सोबत डि.बी. पथकातील सपोनि/राहुल किटे, पोलीस अमंलदार- संदीप कडु, गणेश मुदमाळी, रुपेश महादुले, शिवाजी दिंडे यांनी केली आहे.

### पार्थ सिडाम नगरपंचायतीच्या मुख्याधिकारीपदी रुजू



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

भिवापूर नगरपंचायतीच्या मुख्याधिकारीपदी पार्थ सिडाम यांची नियुक्ती झाली असून सोमवारी त्यांनी पदाची सूत्रे स्वीकारली. प्रभारी मुख्याधिकारी दीपिका गायकवाड यांनी सिडाम यांच्याकडे पदभार सोपविला. सिडाम यांच्या सेवेचा परिविक्षाधीन कालावधी असून तो ३१ ऑक्टोबरपर्यंत असल्याची माहिती आहे. पदभार स्वीकारल्यानंतर नगरपंचायत कार्यालयात नगराध्यक्षा सुषमा श्रीरामे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी नगरसेवक विवेक ठाकरे, दिनेश रामटेके, अधीक्षक आरिफ शेख, अभियंता सावीन कांबळे, मयूर वनरासे, सौरभ तोंडे यांच्यासह नगरपंचायतीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी सिडाम यांचे स्वागत करून त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

### गृह अर्थशास्त्र विभागातर्फे आंतरराष्ट्रीय स्तनपान सप्ताह




**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नुकताच नबीरा महाविद्यालय काटोल येथे HBT आपला दवाखाना काटोल येथील मेडिकल ऑफिसर डॉ. वृषाली तंबाखे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते त्यांनी पावर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे आपले व्याख्यान दिले यामध्ये त्यांनी मुलींना स्तनपानाचे महत्त्व, स्तनपानाच्या पूर्वी आणि नंतर घेण्यात येणार जी काळजी तसेच स्त्रीचे आरोग्य आणि स्तनपान यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे आयोजन गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉक्टर दमयंती घागरगुंडे यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन इंग्रजी विभागाच्या डॉ.मीनाक्षी राऊत मॅडम यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गृह अर्थशास्त्र विभागाच्या प्रा. कल्याणी दंडारे यांनी केले. या कार्यक्रमाला सर्व विभागातील महिला प्राध्यापक, डॉ.योगिता फुले, प्रा. माधुरी तायवाडे, प्रा. भाग्यश्री घुरडे मॅडम, प्रा. शुभांगी लामसोगे तसेच आपला दवाखाना येतील सिस्टर मेरी आणि भूषण सर उपस्थित होते. या कार्यक्रमाकरिता महाविद्यालयातील सर्वच विभागातील १४४ मुली उपस्थित होत्या.

### कच्चे तेल महागले

**वृत्तसंस्था, तेहरान**

हॉर्मुझची सामुद्रधुनी खुली होण्याबाबतची अनिश्चितता कायम राहिल्याने सोमवार दि. १० ऑगस्ट रोजी जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या दरात वाढ झाली. ओमानसोबतच्या नवीन सागरी वाहतूक कराराची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे इराणने म्हटले असले, तरी अमेरिकेने त्यांच्या इतर अटी पूर्ण करणे आवश्यक असल्याचा पुनरुच्चार केला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात ब्रेंट क्रूडचे दर १.०९ टक्क्यांनी वाढून प्रति बॅरल ८४.४६ डॉलरवर पोहोचले, तर अमेरिकन वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट (डब्ल्यूटीआय) क्रूडचे फ्युचर्स दर ६१ सेंट्स म्हणजेच ०.७८ टक्क्यांनी वाढून प्रति बॅरल ७८.७९ डॉलरवर गेले आहेत.

युद्ध सुरू होण्यापूर्वी जगातील एकूण तेलाच्या एक पंचमांश वाहतूक याच मार्गाने होत असे. इराण आणि ओमानदरम्यान लवकरच करार होऊन हॉर्मुझची सामुद्रधुनी खुली होईल, या आशेने गेल्या आठवड्यात दोन्ही बेंचमार्क दरांमध्ये ७ टक्क्यांहून अधिक घसरण झाली होती. ओमानसोबतचा करार अंतिम टप्प्यात असला तरी, वॉशिंग्टनने त्यांच्या इतर अटी पूर्ण केल्यावरच हा सागरी मार्ग खुला केला जाईल, असा इशारा इराणने रविवारी दिला. अमेरिकेने केलेल्या व्यापक हल्ल्यांची नुकसानभरपाई इराणला द्यावी, ही यात मुख्य अट आहे.

# भूखंड विकासाच्या नावाखाली नागरिकांची फसवणूक झाल्यास कठोर कारवाई !

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पोलीस आयुक्त कार्यालयात कायदा व सुरक्षा नियोजनाचा आढावा, सिसीटिव्ही यंत्रणा होणार सुधारणा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
लॅंड डेव्हलपमेंट अर्थात भूखंड विकासाच्या नावाखाली कोणत्याही नागरिकाची फसवणूक होऊ नये यासाठी जे दोषी आढळतील त्यांच्याबाबत कोणतेही हयगय केली जाणार नाही. शहराच्या मध्यवर्ती भागातील अनेक कुटुंबातील मुले ही नोकरीनिमित्त विदेशात व परगावी आहेत. येथे जे ज्येष्ठ नागरिक आहेत अशा पालकांची दिशाभूल करुन त्यांच्या राहत्या जागेबाबत जर कोणी बळजबरी करत असेल तर अशा पालकांनी नजीकच्या पोलीसांशी थेट संपर्क साधावा असे आवाहन महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. पोलीस विभागानेही अशा प्रकरणात सुमोटो कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.



पोलीस आयुक्त कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार डॉ. राजीव पोतदार, पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, सहपोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, अपर पोलीस आयुक्त राजेद्र दाभाडे, विनीता साहू, वसंत परदेशी, जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, पोलीस उपायुक्त आदित्य मिलखेरकर, राहूल माकणीकर, संदीप पखाले, राहूल मदने, ऋषीकेश रेड्डी, अन्नपूर्णा सिंग, रश्मिता राव, नित्यानंद झा, रमेश धुमाळ व अपर पोलीस अधीक्षक अनिल मस्के आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

नागपूर शहराच्या सुरक्षितेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारची कमतरता पडू नये यासाठी प्रशासन दक्ष आहे. जिल्हा वार्षिक योजनेतूनही अधिकाधिक निधी आपण उपलब्ध करुन देत आहोत. याचबरोबर महानगरपालिके अंतर्गत सिसिटिव्ही कॅमेऱ्यांची यंत्रणा अधिक सशक्त केली जात आहे. ग्रामीण व शहरी भागासाठी ही यंत्रणा अधिक एकीकृतपणे राबविण्यासाठी आवश्यकती यंत्रसामुग्री उपलब्ध करुन दिली जाईल, असे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

नागपूर ग्रामीण आणि नागपूर शहर अशी व्यवस्था असलेल्या सिसिटिव्ही कॅमेरांचे एक संयुक्त केंद्र निर्माण करण्याला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या बैठकीत मान्यता दिली.

सद्यस्थितीत नागपूर येथील सुरक्षिततेच्या दृष्टीने जे कॅमेरे कार्यरत आहेत त्यांचे अपग्रेडेशन करुन ज्या-ज्या ठिकाणी व्यत्यय आहे तो दूर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. ग्रामीण भागातील सिसिटिव्ही प्रकल्प अधिवेशनापूर्वी पूर्ण करुन शहरातील प्रकल्प हा तांत्रीकदृष्टया एकाच संस्थेला देणे हितकारक ठरेल यावर या बैठकीत चर्चा करण्यात आली.

वाहतूक व्यवस्थेसंदर्भात सोशल मिडीयावर मोठ्या प्रमाणात तक्रारी येत आहेत. बांधकामे जरी सुरु असली तरी त्या ठिकाणची वाहतूक अधिक सुलभ करण्यासाठी पोलीसांनी दक्षता घ्यावी असे ते म्हणाले.

नागपूर पोलीस विभागामार्फत आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी नवी प्रणाली व कार्यरचना करण्यात आली आहे.

एआय आधारित सिम्बा प्रणालीद्वारे गुन्ह्यांचा डाटा अपडेट करण्यात आला आहे. सिसिटिव्ही, फोटो, व्हिडीओ, ऑडिओ आदी माध्यमातून गुन्हेगारांच्या डेटांचेही संकलन करण्यात आले आहे. सोशल मिडीया यावर गरुड दृष्टी या सॉफ्टवेअरमार्फत पोलीसांची स्वतंत्र टिम अहोरात्र मॉनिटर करत असून नागरिकांना सुरक्षिततेचा प्रत्यय पोलीस प्रशासनामार्फत देण्यासाठी आम्ही प्रयत्नशिल असल्याचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी सांगितले.

---

थोडक्यात

## तेजश्री उपाध्याय यांच्या आयोजनात भव्य मेहंदी स्पर्धा यशस्वीरीत्या संपन्न

### ६० स्पर्धकांनी दाखविले कलाकौशल्य विजेत्यांना रोख पारितोषिकाने गौरविण्यात आले



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
तेजश्री उपाध्याय यांच्या आयोजनात भव्य मेहंदी स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत तब्बल ६० स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या सर्जनशीलतेचे, कलाकौशल्याचे आणि आकर्षक मेहंदी डिझाइन्सचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. स्पधेर्चे परीक्षण परीक्षक मीना गुप्ता आणि प्रणिता राऊत यांनी केले. मेहंदीची सुंदरता, स्वच्छता, बारीकसारीक कलाकुसर, सर्जनशीलता, डिझाइन आणि एकूण सादरीकरण या विविध निकषांच्या आधारे सर्व स्पर्धकांचे परीक्षण करण्यात आले. अटीतटीच्या स्पधेर्नंतर विजेत्यांची घोषणा करण्यात आली. महेक वर्मा हिने विजेतेपद पटकावले. इकरा फातिमा हिने प्रथम उपविजेतेपद, तर इफरा तनझीम हिने द्वितीय उपविजेतेपद मिळविले. विजेत्या महेक वमार्ला ५,०००, प्रथम उपविजेत्या इकरा फातिमाला २,००० आणि द्वितीय उपविजेत्या इफरा तनजीमला १,००० चे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

आयोजक तेजश्री उपाध्याय यांनी सर्व ६० स्पर्धक, परीक्षक तसेच स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. अशा उपक्रमांमुळे प्रतिभावान मेहंदी कलाकारांना आपले कलाकौशल्य सादर करण्याची, ओळख निर्माण करण्याची आणि पुढे जाण्याची उत्तम संधी मिळते, असे त्यांनी सांगितले. उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात ही स्पर्धा यशस्वीरीत्या संपन्न झाली. सर्व ६० स्पर्धकांच्या सर्जनशीलतेचे आणि मेहनतीचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

## म.अंनिस चा ३८ वर्धापन दिन थाटात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी - मिलिंद गाडेकर**
महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती, नागपूर जिल्हा शाखेच्या वतीने म.अंनिस चा ३८ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात उमरेड रोड, सक्करदरा परिसरातील सेवादल भवन येथे साजरा करण्यात आला.अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष जगदिशसिंग होते. यावेळी राज्य उपाध्यक्ष संजय शेंडे यांनी म.अंनिस च्या कार्य व पध्दतीची पंचसूत्री उपस्थितांना समजावून सांगितली व अंनिसचे कार्य कशा पध्दतीने चालते हे समजावून सांगितले.यावेळी राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनी अंनिसच्या स्थापनेमागील उद्देश,भुमिका व इतिहासाची मुद्देसूद मांडणी केली.अध्यक्षीय मनोगतात जगदिशसिंग यांनी अंधश्रध्दा निर्मूलनाची भारत देशात व भारतातील सर्व क्षेत्रात प्रचंड गरज असल्याचे उदाहरणासह स्पष्ट करून यावर संवैधानिक बांधिलकी हाच सर्वोत्तम उपाय असल्याचे प्रतिपादन केले.

यावेळी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्न आणि शंकाचे निरसन मान्यवरांनी केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.डॉ कविता मते यांनी केले तर आभार जिल्हा प्रधान सचिव विनोद उलीपवार यांनी मानले.कार्यक्रमात सुरेंद्र बुराडे, रवींद्र राऊत,सुधाताई बामनपल्लीवार, संजय भुरे, भुरे ताई,मालती वराडे, रंजना कोल्हे,संजय पन्नासे,अनिल पुंजे,संजय भलमे,मंजुर्षी पोफरे, विजय बाभुळकर,बाबा बीडकर, कमलाकर देशमुख,संजय लाडे, प्रभाकर बोरकर, गजानन डोंगरे, सौ. डोंगरे, सुनील मेश्राम, अनिल दिवाण,शशिकांत रायपुरे,आगासे, प्रियंका ठाकरे यांचेसह नवीन व उत्सूक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात संविधान प्रास्ताविकेच्या वाचनाने व अभिवादन गीताने झाली.

## माजी आ.राजू पारवे यांच्या दत्तक कन्या पूनम निखारची ॲथलेटिक्समध्ये दमदार कामगिरी

### ४०० मीटर धावण्यात प्रथम, डेकॅथलॉनमध्ये द्वितीय क्रमांक; महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
उमरेडच्या बुधवारी पेठ परिसरातील माजी आमदार राजूभाऊ पारवे यांच्या दत्तक कन्या कु. पूनम निखार हिने आपल्या मेहनतीची, जिद्दीची



आणि क्रीडा प्रतिभेची दमदार छाप उमटवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. नागपूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या निवड चाचणीत पूनमने उत्कृष्ट कामगिरी केली. ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तिने प्रथम क्रमांक पटकावत अव्वल स्थान मिळविले. तसेच डेकॅथलॉन स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत तिने आपल्या क्रीडा कौशल्याची प्रचिती दिली. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर पूनम निखार हिची महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर मिळविलेले हे यश तिच्या क्रीडा कारकिर्दीसाठी निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

पूनमच्या या यशामुळे तिच्या कुटुंबासह उमरेडच्या क्रीडा क्षेत्रातही आनंदाचे वातावरण आहे. स्थानिक पातळीवरून राज्यस्तरावर झेप घेत तिने उमरेडच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, आगामी महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पर्धेतही पूनमने अशीच दमदार कामगिरी करून उमरेडचे नाव राज्याच्या क्रीडा क्षेत्रात उज्ज्वल करावे, यासाठी तिला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत. जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते, याचे पूनम निखारचे यश हे उत्तम उदाहरण ठरले आहे.

---

## गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव, १५० हून अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप

### मराठा विद्या प्रसारक समाजातर्फे गुणवंत विद्यार्थी सत्कार व शिष्यवृत्ती वितरण समारंभ उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
मराठा विद्या प्रसारक समाज, नागपूर च्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही मराठा समाजातील गुणवंत, होतकरू व गरजू विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच शिष्यवृत्ती वितरण समारंभ रविवारी (९ ऑगस्ट) छत्रपती शिवाजी महाराज स्मृती सभागृह, सक्करदरा चौकात उत्साहात पार पडला.

संस्थेचे अध्यक्ष श्रीमंत डॉ. राजे मुधोजी भोसले यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यक्रमाला नागपूर शहराच्या महापौर नितातार्ड ठाकरे तसेच रश्मीता राव (आयपीएस), पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ४, नागपूर शहर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. यावेळी समाजातील १५० हून अधिक होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना एकूण १ लाख ७५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती



वितरित करण्यात आली. शैक्षणिक क्षेत्राबरोबरच क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक तसेच विविध विशेष क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रा. शिशिर अशोकराव बागल, प्रशांत दौलतराव शिर्के, चेतन अरविंद मामुलकर आणि कु. आश्लेषा पुरुषोत्तम कावळे यांनी आचार्य (पी.एचडी.) पदवी प्राप्त केल्याबद्दल त्यांचा सन्मानपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रतिमांना मान्यवरांसह ज्येष्ठ आजीव सभासद शंकरराव जाधव व हंबीरराव मोहिते यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक संस्थेचे मुख्य सचिव डॉ. प्रकाश मोहिते यांनी केले. प्रारंभीचे संचालन समितीचे सहसंयोजक गजाननराव कावळे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन नरेंद्र मोहिते यांनी केले, तर आभार समितीचे मुख्य संयोजक सुशांत शिंदे यांनी मानले.

कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी प्रवीण शिर्के, राजेश काटे, दिलीप सस्ते, निलेश चव्हाण, प्रशांत (बालू) भोसले, अनुप जाधव, सतीश मोहिते, अनिताताई जाधव, महेंद्र शिंदे, अविनाश घोगले, हरीश इंगळे, अमर पिसाळ व महेश पवार यांच्यासह समाजातील मान्यवर उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देतानाच गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या माध्यमातून शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ देण्याचा उपक्रम समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे यावेळी अधोरेखित झाले. समारंभाला समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

---

## आमगाव नगरीत दुमदुमली भव्य कावड यात्रा

### संस्कार ग्रुपतर्फे वाघ नदी ते महादेव पहाडीपर्यंत कावड यात्रा, मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**
श्रावण महिन्याच्या पवित्र पर्वानिमित्त आमगाव नगरीत संस्कार ग्रुपच्या वतीने भव्य कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले. वाघ नदी येथून पवित्र जल घेऊन महादेव पहाडी येथील भगवान शिवाच्या मंदिरापर्यंत कावड यात्रा काढण्यात आली. या यात्रेत मोठ्या संख्येने शिवभक्त व भाविक सहभागी झाले होते.

यावेळी भाविकांनी वाघ नदीचे पवित्र जल कावडीत भरून भगवान महादेवाच्या जयघोषात यात्रेला सुरुवात केली.

हर हर महादेव, बम बम भोले अशा जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. पारंपरिक पद्धतीने आणि भक्तिमय वातावरणात निघालेल्या या कावड यात्रेने आमगाव नगरीत धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

कावड यात्रेच्या मार्गावर भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत भगवान महादेवाचे दर्शन घेतले. यात्रेदरम्यान विविध ठिकाणी भाविकांचे स्वागत करण्यात आले. महादेव पहाडी येथे पोहोचल्यानंतर पवित्र जलाने भगवान शिवाचा जलाभिषेक करण्यात आला. यावेळी भक्तांनी भगवान महादेवाची पूजा-अर्चना करून परिसराच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

संस्कार ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कावड यात्रेत महिला, पुरुष तसेच युवक-युवतींचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. भक्तिमय वातावरण, ढोल-ताशांचा गजर आणि हर हर महादेवच्या जयघोषामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

कावड यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी संस्कार ग्रुपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. यात्रेदरम्यान भाविकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी आवश्यक नियोजन करण्यात आले होते. मोठ्या संख्येने भाविकांच्या सहभागामुळे यंदाची कावड यात्रा विशेष आकर्षण ठरली.

---

## लायन्स क्लब ऑफ नागपूर संस्कृती व लिओ लायन्स क्लब संस्कृती स्टार्सचा संयुक्त पदग्रहण सोहळा उत्साहात

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
लायन्स क्लब ऑफ नागपूर संस्कृती आणि लिओ लायन्स क्लब ऑफ नागपूर संस्कृती स्टार्स यांचा संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला कार्यक्रम ३० जुलै रोजी नुकताच पार पडला. पदग्रहण समारंभ गणेशपेठ कॉलनी येथील एलिटेस्टे, द राहुल येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. लायन्स इंटर नॅशनलच्या डिस्ट्रिक्ट ३२३४ एच १, रिजन- ८, झोन-३ अंतर्गत झालेल्या या सोहळ्यात नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व




पदग्रहण अधिकारी PMCC लायन डॉ. राजे मुधोजी भोसले होते. SVDG लायन निशिकांत प्रतापे यांची प्रमुख उपस्थिती होती, तर ढउङ्क लायन विजय पालीवाल यांनी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन केले. रिजन चेअरपर्सन लायन डॉ. रवींद्र हुसके तसेच झोन चेअरपर्सन लायन बृजरतन लाखोटिया यांचीही प्रमुख उपस्थिती होती. दीपप्रज्वलन, ध्वजवंदन व मान्यवरांचे स्वागत झाल्यानंतर नव्या सदस्यांचा परिचय व पदग्रहण सोहळा पार पडला. प्रमुख पाहुणे डॉ. राजे मुधोजी भोसले यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना पदाची शपथ देऊन त्यांना सामाजिक कायासाठी शुभेच्छा दिल्यात.

यावेळी मान्यवरांनी लायन्स क्लबच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांसाठी विविध सेवा उपक्रम राबविण्याचे आवाहन केले.

तसेच तरुणाईचा सामाजिक कार्यातील सहभाग वाढविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. लायन्स क्लब ऑफ नागपूर संस्कृतीच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीत अध्यक्षपदी लायन कविता मेश्राम, उपाध्यक्षपदी लायन रवींद्र माहुलकर, सचिवपदी लायन शकीला अली आणि खजिनदारपदी लायन नाझिया शेख यांनी पदभार स्वीकारला. तसेच लिओ लायन्स क्लब ऑफ नागपूर संस्कृती स्टार्सच्या अध्यक्षपदी लिओ लायन एरिश खान MJF, उपाध्यक्षपदी लिओ लायन फरजान नोमान शेख, सचिवपदी लिओ लायन अरबाज मंसुरी आणि खजिनदारपदी लिओ लायन फरिहा माहीन शेख यांची निवड झाली.

यावेळी नवनिर्वाचित अध्यक्षांनी आपल्या मनोगतात आगामी काळात सामाजिक बांधिलकी जपत विविध सेवाभावी उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी लायन्स संस्कृती नागपूरच्या फाउंडर प्रेसिडेंट लायन सना गानिया खान PMJF, लायन महेश देशपांडे, सतीश अलोने, कल्याणी भुरे, राजेश भुरे, ईश्वर मेश्राम, शशी मेश्राम, समृद्धी डोंगरे तसेच लिओ लायन सतीश राणे, आरती नामदेव, हिमानी शिवाळे, तुषार पिल्ले, शिव दुबे आणि लिओ लायन युसूफ खान यांचे सहकार्य लाभले. सामाजिक सेवा, नेतृत्व आणि तरुणाईचा सहभाग या त्रिसूत्रीवर आगामी वर्षात प्रभावीपणे कार्य करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

थोडक्यात

## सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूलमध्ये रेड रिबन प्रश्नमंजुषा स्पर्धा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या अनुषंगाने युवकांमध्ये एचआयव्ही/ एड्स प्रतिबंधाबाबत जनजागृती, एचआयव्ही संसगार्संदभार्तील गैरसमज दूर करून प्रतिबंधात्मक उपाययोजना, तपासणी व उपचाराबाबत माहिती देण्यासाठी तसेच एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तींबाबत भेदभावविरहित दृष्टिकोन निर्माण करण्याच्या उद्देशाने सिव्हिल लाईन्स मार्गावरील सेंट उसुर्ला गर्ल्स हायस्कूल येथे काल (दि.८) जिल्हास्तरीय रेड रिबन प्रश्नमंजुषा स्पधेर्चे आयोजन करण्यात आले. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निवृत्ती राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमास प्रशासकीय अधिकारी डॉ. रिना लांजेवार, प्रसूती व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. त्रिशाला धेमरे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी तनुजा फाळे, पी.ओ. मनोज राऊत तसेच सेंट उसुर्ला गर्ल्स हायस्कूलच्या प्राचार्य शीतल पिटर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रश्नमंजुषा स्पर्धेत एचआयव्ही/एड्स, संसर्गाचे मार्ग, प्रतिबंधात्मक उपाययोजना, एचआयव्ही तपासणी व उपचार तसेच एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तींशी भेदभाव न करण्याबाबत प्रश्नांचा समावेश करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवून स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना एचआयव्ही संसर्गाचे संभाव्य मार्ग, संसगार्चा प्रसार न होण्याचे मार्ग, प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच वेळेवर एचआयव्ही तपासणी व उपचाराचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. दैनंदिन सामाजिक संपर्क, हस्तांदोलन, एकत्र बसणे अथवा एकत्र भोजन केल्याने एचआयव्हीचा संसर्ग होत नाही, याबाबतही विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. प्रश्नमंजुषा स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला माधुरी गिरी, लता जिकार, सुधामा, तृप्ती आटे, राजणी सायरे व समुपदेशक सुवर्णा गिरी यांच्यासह विद्यार्थी व समुपदेशक उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये एचआयव्ही/ एड्सबाबत शास्त्रीय व अचूक माहिती पोहोचविण्यासोबतच एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तींप्रती सन्मान, संवेदनशीलता आणि भेदभावविरहित दृष्टिकोन निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.

# खोट्या अहवालाने मला अपात्र ठरविले!

### मांगरूळच्या सरपंच मंजुषा जिभकाटे यांचा अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप; भाजपला रामराम ठोकून शिवसेनेत प्रवेश



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

शासकीय आबादीच्या जमिनीवर अतिक्रमण केल्याच्या आरोपावरून सरपंचपदासाठी अपात्र ठरविण्यात आलेल्या मांगरूळच्या सरपंच मंजुषा सुनील जिभकाटे यांनी प्रशासनाच्या कारभारावरच सवाल उपस्थित केला आहे. अतिक्रमण नेमके कुठे, कोणत्या गट क्रमांकावर आणि किती क्षेत्रात आहे, हेच अहवालात स्पष्ट नाही. मग मला अपात्र कशाच्या आधारावर केले? असा सवाल त्यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केला. यावेळी शिवसेना (शिंदे) उमरेड विधानसभा क्षेत्राचे संघटन सचिव दिलीप सोनटक्के, उपजिल्हाप्रमुख संदीप निंबार्ते, अविनाश चिमुरकर, माजी उपसरपंच स्वप्नील मालके उपस्थित होते. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अपात्रतेच्या आदेशाला अंतरिम स्थगिती दिल्यानंतर जिभकाटे यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले. प्रत्यक्ष चौकशी न करताच ग्रामपंचायतीत बसून अहवाल तयार करण्यात आला. चौकशीचे पत्रही आपल्याला देण्यात आले नाही, असा त्यांचा दावा आहे. कर आकारणीच्या जुन्या नोंदींमध्येही विसंगती असल्याचे त्यांनी सांगितले.

माझे घर अतिक्रमणात आणि शेजारचे घर गावठाणात कसे? असा सवाल करीत त्यांनी प्रशासनाच्या अहवालातील विसंगती उघड केली. गावठाण प्रमाणपत्रासाठी अर्ज करूनही राजकीय दबावामुळे चौकशी टाळली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान, भाजप जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत यांनी साथ न देता काँग्रेसच्या तक्रारदारांना छुपी मदत केली, असा गंभीर आरोपही जिभकाटे यांनी केला. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सहा-सात वेळा दाद मागूनही न्याय मिळाला नाही, असे त्या म्हणाल्या. न्याय मिळत नसेल तर अशा पक्षात राहायचे कशासाठी? असा सवाल करीत भाजपला रामराम ठोकून शिवसेनेत प्रवेश केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईसाठी वरिष्ठांकडे तक्रार करून न्यायालयीन लढा पुढे सुरू ठेवण्याचा इशाराही त्यांनी दिला.

# दिव्यांगांना शिक्षण, आरोग्य व रोजगार देण्यासाठी कटिबद्ध

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन, जयपूर फूट साहित्य व सहायक साधने मोजमाप व वाटप शिबीराचा समारोप

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



सक्षमपणे जीवन जगण्यासाठी दिव्यांगांना शिक्षण, आरोग्य सुविधा व रोजगार उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असून त्यासाठी राज्य सरकार व नागपूर महापालिका निश्चितपणे कटिबद्ध आहे त्याचप्रमाणे योजनांच्या लाभापासून नागपूर जिल्ह्यातील एकही दिव्यांग वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.

मुख्यमंत्री कार्यालय, मनपा, भगवान महावीर विकलांग सहायता समिती, नागपूर जिल्हा परिषद, नागपूर जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र व टाटा ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने गेल्या ७ ऑगस्टपासून कविवर्य सुरेश भट सभागृहात सुरू झालेल्या जयपूर फूट साहित्य व सहायक साधने, मोजमाप व वाटप शिबीराचा समारोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज (ता. १०) झाला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याहस्ते दिव्यांगांना जयपूर फूट व सहायक साधनांचे वितरण करण्यात आले. व्यासपीठावर राज्याचे महसूल मंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल, महापौर निता ठाकरे, आमदार कृपाल तुमाने, आमदार प्रा. संजय भेंडे, आमदार डॉ. राजीव पोद्दार, आमदार मोहन मते, आमदार चरणसिंग ठाकूर, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, आयुक्त डॉ. विपीन, मुख्यमंत्री कार्यालयातील सहसचिव आशा पठाण, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, माजी महापौर दयाशंकर तिवारी, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, एमआयएमचे गटनेता शकील पटेल, मुस्लिम लिगचे गटनेता असलम मुल्ला खान, शिवसेना (उबाठा) गटनेता किशोर कुमेरिया, शिवसेनेचे गटनेता गणेश चर्लेवार, बसपाच्या गटनेत्या हर्षला जयस्वाल, माजी आमदार नाना शामकुळे, महिला व बालकल्याण विशेष समिती सभापती सारिका नांदुरकर, नगरसेवक श्रीकांत आगलावे, जयपूर फूट सहायता समितीचे प्रमुख पी. आर. मेहता, स्थापत्य समितीच्या सभापती अश्विनी जिचकार, नगरसेवक दिनेश यादव, भगवान महावीर विकलांग सहायता समितीचे सुबोध भंडारी, यांच्यासह नगरसेवक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

**सन्मानाने जगण्यासाठी सर्वतोपरी मदत करू : मुख्यमंत्री फडणवीस**

यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, जयपूर फूट व इतर सहायक साधने दिव्यांगांना मिळाल्यानंतर त्यांच्या जीवनात बराच बदल होत असल्याचे आपण पाहिले आहे. त्यांच्या जीवनात एक प्रकारचे परिवर्तन झाले आहे. दिव्यांगांपर्यंत सर्व योजना पोहोचाव्या या दृष्टीने अशा शिबीराचा मोठा फायदा होत असतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिव्यांगांसाठी विविध योजना सुरू केल्या आहे. केंद्र व राज्य सरकारच्या योजनांच्या माध्यमातून सातत्याने मनपाद्वारे प्रयत्न होत आहे. सर्व लाभार्थ्यांचा मनपाने रेकॉर्ड ठेवावा. दिव्यांगांना आयुष्यात पुन्हा सहाय्यक साधनांची आवश्यकता भासेल तेव्हा हा रेकॉर्ड काम येईल, असेही त्यांनी सांगितले.

दिव्यांगांना सक्षम करण्यासाठी रोजगार, शिक्षण व आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या तिन्ही बाबीतून दिव्यांगांना समाजात सन्मान मिळवून देण्यास मदत होणार आहे. या माध्यमातून दिव्यांगांची दिव्यांगता कशी कमी करता येईल, याद्दष्टीने सुद्धा विचार होण्याची गरज आहे. ऐकू येत नसल्याने अनेक मुले बोलू शकत नाही. कर्णबधिर असलेल्यांना कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया मोफत करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. ही शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर कर्णबधीर असलेले दिव्यांग सुद्धा बोलू शकतात. दिव्यांगांना सुद्धा सन्मानाने जगण्यासाठी गृहनिर्माण योजनांचा लाभ दिला जाईल.

दिव्यांगांसाठी ३६५ दिवस काम करावे लागेल. यासाठी यूडीआयडी कार्ड काढून एकही दिव्यांग योजनांपासून वंचित राहणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल. यासाठी मनपाने झोननिहाय शिबीरे घ्यावे. दिव्यांगांच्या पाठीशी राज्य सरकार व मनपा कायम उभी राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

**दिव्यांगांना आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न : महापौर**

जयपूर फूट साहित्य व सहायक साधने, मोजमाप व वाटप शिबीराच्या माध्यमातून नागपूर जिल्ह्यातील जवळपास ४ हजारावर लाभार्थींना मदत देऊन दिव्यांगांना स्वावलंबी व आत्मनिर्भर करण्याचा हा एक प्रयत्न असल्याचे महापौर निता ठाकरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना सांगितले. दिव्यांगांना सुद्धा जगण्याची समान संधी याद्वारे देण्याचा प्रयत्न आहे. केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्याने दिव्यांगांना असलेल्या योजनांचा लाभ देण्यासाठी तसेच मनपातर्फे सुद्धा प्रयत्न करण्यात येत आहे. गेल्या ७ ऑगस्टपासून सुरू असलेले शिबीर योजना समाजाच्या अखेरच्या घटकापर्यंत पोहोचविण्यास मनपा कटिबद्ध राहील. मनपातर्फे दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी १४ योजना राबविण्यात येत असल्याचे महापौरांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दीपप्रज्वलित केल्यानंतर कार्यक्रमाची सुरूवात झाली. महापौर निता ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मानाचा दुपट्टा व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे स्वागत उपमहापौर लिला हाथीबेड यांनी केले.

**दिव्यांगांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरण**

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रवास पोपटलाल कैकाडे, कुंदन विश्वास शिरसाट, रोहन अमोल देशभ्रतार, भारती मांगलेकर, प्रकाश देवराज चिलविलवार, कु. कृतिका खापेकर, रेहान नितीन दारव्हनकर यांना जयपूर फूट व सहायक साधनांचे वाटप केले. व्यासपीठावर व्हील चेअरने आलेले दिव्यांग जयपूर फूट लावल्यानंतर कुणाचीही मदत न घेता चालत गेले.

**पी. आर. मेहता यांचा सत्कार**

भगवान महावीर विकलांग सहायता समितीचे प्रमुख पी. आर. मेहता यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनपाचा मानाचा दुपट्टा व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. त्याचप्रमाणे भोजनाची व्यवस्था करणाऱ्या अन्नामृतचे श्री. श्यामसुंदर शर्मा व श्री. प्रशांत उगेमुगे यांचाही सत्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला.

**कर्णबधिरांसाठी विशेष सुविधा**

या कार्यक्रमात अनेक कर्णबधिर उपस्थित होते. त्यांना हा सर्व कार्यक्रम समजावा, यासाठी साईन लँग्वेजच्या माध्यमातून कार्यक्रम समजून घेण्याची सुविधा उपलब्ध करून दिली होती. यावेळी उपस्थित दोन साईन लॅग्वेज तज्ज्ञांनी संपूर्ण कार्यक्रम सांकेतिक भाषेच्या माध्यमातून कर्णबधिरांना समजून घेण्याची संधी उपलब्ध करून दिली. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी यांनी केले आभार सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी मानले.

# ओबीसी हक्कांसाठी बल्लारपुरात मंडल यात्रेचे स्वागत

### जातनिहाय जनगणना, सामाजिक न्याय व विविध मागण्यांसाठी दुचाकी रॅली, संत तुकाराम सभागृहात जाहीर सभा

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर- धनंजय पांढरे**




ओबीसी समाजाच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी आयोजित सकल ओबीसी महामोर्चाच्या मंडल यात्रेचे शनिवारी, ८ ऑगस्ट रोजी बल्लारपूर शहरात आगमन झाले. नगर परिषद चौक येथे या यात्रेचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यावेळी पदाधिकारी, नगरसेवक, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगराध्यक्षा डॉ. अल्का अनिल वाढई, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक डॉ. अनिल सदाशिव वाढई, शहराध्यक्ष तथा नगर परिषद गटनेते अब्दुल करीम शेख, ओबीसी समन्वय समितीचे माजी अध्यक्ष विवेक खुटेमाटे, काँग्रेस ओबीसी बल्लारपूरचे शहराध्यक्ष गणपत इटणकर, स्वीकृत नगरसेवक घनश्याम मूलचंदानी, स्वीकृत नगरसेवक भास्कर माकोडे, श्रीधर फटाले आणि अशोक चितले यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून सकल ओबीसी महामोर्चाच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला.

सकल ओबीसी महामोर्चाचे मुख्य संयोजक उमेश कोराम यांच्या नेतृत्वाखाली मंडल यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. ओबीसी समाजाची जातनिहाय जनगणना, सामाजिक न्याय, घटनात्मक हक्क तसेच विविध प्रलंबित मागण्यांबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने ही यात्रा काढण्यात आली. यात्रेच्या निमित्ताने बल्लारपूर शहरातून भव्य दुचाकी रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. ओबीसी समाजाच्या विविध मागण्यांसाठी एकजूट दाखवत सहभागी नागरिकांनी आपला पाठिंबा व्यक्त केला.

यानंतर संत तुकाराम सभागृह येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले. सभेत नगराध्यक्षा डॉ. अल्का अनिल वाढई यांनी मनोगत व्यक्त करत ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी एकजूट, सामाजिक न्याय आणि जातनिहाय जनगणनेचे महत्त्व अधोरेखित केले.

ओबीसी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी सुरू असलेल्या लढ्याला आपला ठाम पाठिंबा असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.जाहीर सभेत उपस्थित अन्य मान्यवरांनीही ओबीसी समाजाच्या विविध प्रश्नांवर आपली भूमिका मांडली. या कार्यक्रमाला ओबीसी समाजबांधवांची उपस्थिती होती.

## श्री सोमेश्वर कलामंच सामाजिक संस्था रजि सिंधुदुर्ग या संस्थेला कोकण कला गौरव पुरस्कार २०२६ने पुरस्काराने सन्मानित

**दै. सिंहवाणी वृत्त, ओरस - गुरुनाथ तिरपणकर**

रविवार दिनांक -०९ ऑगस्ट २०२६ रोजी, महाराष्ट्र पत्रकार संघ मुंबई,कोकण बुक ऑफ रेकॉर्ड, यशश्री फाउंडेशन सिंधुदुर्ग आयोजित कोकण कला साहित्य गौरव संमेलन सिंधुदुर्ग नगरी ओरस येथे २०२६ आयोजित करण्यात आले आणि या सोहळ्यामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या, सातत्याने समाज हिताचे कार्य करणाऱ्या



संस्थांना, साहित्यिकांना, कलाकारांना, समाजसेवकांना सन्मान चिन्ह, मानपत्र,शाल देऊन मान्यवरांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले. यात श्री सोमेश्वर कलामंच सामाजिक संस्था रजि सिंधुदुर्ग या संस्थेला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह, मानपत्र,आणि शाल देऊन कला गौरव पुरस्कार २०२६ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. श्री सोमेश्वर कलामंच सामाजिक संस्था सिंधुदुर्ग संस्था सातत्याने निस्वार्थीपणे सामाजिक कार्य करत आहे. श्री सोमेश्वर कलामंच प्रस्तुत गराजलो रे गराजलो या नाटकाद्वारे जनजागृती करता करता प्रत्यक्षात १५ मुद्दे घेऊन गराजलो रे गराजलो ही एक चळवळ गेली अनेक वर्षे कार्यरत आहे. कोकणातील भावी पिढीचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शाळा, हायस्कूल, कॉलेजमध्ये जाऊन व्यक्तीमत्त्व विकास कसा करावा यावर मार्गदर्शन करण्यात येत आहे. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सहदेव धर्णे, कांचन धर्णे-गावडे, दत्तप्रसाद बांदिवडेकर उपस्थित होते.संस्थेला कोकण कला गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# २०२७ च्या जनगणनेत धर्म, पंथ आणि सामाजिक ओळखींची अचूक नोंद करण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

२०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेत विविध धर्म, पंथ, परंपरा आणि सामाजिक समूहांची स्वतंत्र व अचूक नोंद करण्यात यावी, तसेच जनगणनेसोबत होणाऱ्या मॅपिंगमध्येही संबंधित समाजांच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक ओळखींची योग्य नोंद घ्यावी, अशी मागणी सर्व धर्मीय सर्व पंथीय सामाजिक परिषद, नागपूर यांच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर, यांच्यामार्फत भारताचे जनगणना आयुक्त यांच्याकडे करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन भिक्खू ज्ञानज्योती, रेखा महाजन (कबीर पंथ), अतुल दिनकरराव देशमुख (शिक्षक भारती) आणि सुनील चौधरी (संस्थापक, सर्व धर्मीय सर्व पंथीय सामाजिक परिषद) यांच्या प्रमुख उपस्थितीत सादर करण्यात आले. यावेळी प्रशांत ढोरे (ओबीसीमुक्ती मोर्चा), सुभद्रा यादव, भन्ते शांती ज्योती, नाना गेडाम यांच्यासह इतर सामाजिक कार्यकर्ते व



विविध धर्म-पंथांचे प्रतिनिधीही उपस्थित होते. निवेदनात बौद्ध समाजाची स्वतंत्र ओळख, भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारपरंपरेशी संबंधित माहिती, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, आदिवासी समाज, पारशी धर्म, वारकरी संप्रदाय, कबीर पंथ,महानुभाव पंथ तसेच छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज आणि रमाबाई आंबेडकर यांसारख्या महत्त्वाच्या ऐतिहासिक-सामाजिक व्यक्तिमत्त्वांशी संबंधित माहिती जनगणनेच्या नोंदी व मॅपिंगमध्ये योग्य प्रकारे प्रतिबिंबित व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात विशेषतः बौद्ध समाजाच्या लोकसंख्येची अचूक नोंद करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. जनगणनेतील धार्मिक व सामाजिक आकडेवारी ही केवळ संख्या नसून धोरणनिर्मिती, सामाजिक न्याय, शैक्षणिक नियोजन आणि संसाधनांच्या योग्य वाटपासाठी महत्त्वाचा आधार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. अतुल दिनकरराव देशमुख यांनी यावेळी सांगितले की, जनगणना म्हणजे केवळ लोकसंख्या मोजण्याची प्रक्रिया नाही; ती समाजाच्या अस्तित्वाची अधिकृत नोंद असते. त्यामुळे प्रत्येक धर्म, पंथ आणि सामाजिक समूहाची ओळख अचूकपणे नोंदवली जाणे हा सामाजिक न्यायाचाच भाग आहे. जनगणनेच्या वेळी पूर्वीच्या जनगणना नोंदींमध्ये उल्लेख असलेल्या स्थळांची, धार्मिक-सामाजिक परंपरांची आणि संबंधित समुदायांची माहिती तपासून योग्य नोंद करण्यात यावी. कोणत्याही समाजाची ओळख चुकीची नोंदवली जाणार नाही किंवा दुर्लक्षित होणार नाही, यासाठी जनगणना अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश देण्यात यावेत, अशीही मागणी रवींद्र यादव, पांडुरंग भेले, दीपक वाघाडे यांनी निवेदनातून केली.

थोडक्यात

## गावकऱ्यांचा जीव धोक्यात, ढवलापुर-घाटपेढरी येथील १८ कि.मी.चे वास्तव



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पावसाळ्यात ग्रामीण भागातील रस्त्याचे हाल बेहाल होत असताना पारशिवनी तालुक्यातील घाटकुकुडा ते ढवलापूर दरम्यान १८ किलो मिटर प्रवास करताना नागरीकांना चिखल माती तुडवत प्रवास करावा लागत आहे. तर लहान मोठी वाहने चिखल मातीत फसत असल्याने अनेकांना मनस्ताप सहन करुन प्रवास करावा लागत असल्याचे विदारक चित्र ढवलापुर घाटकुकडा या १८ किलो मिटर रस्त्यावर पावसाळ्याच्या दिवसात दिसुन येत आहे. ढवलापुर ते घाटपेढरी मार्ग घनदाट जंगलाच्या मध्यभागी असुन हिंस्त्र पशुनी व्यापला आहे. त्यातच या १८ किलो मिटर मातीच्या रस्ता असल्याने पावसाळ्याच्या दिवसात हा रस्ता पुर्णपणे चिखलमय होत असल्याने या मार्गावरुन वाहन तर सोडा पाणी सुद्धा प्रवास करता येत नसल्याने प्रवाशयाने चिखल माती तुडवत प्रवास करावा लागतो.

दरवर्षी हिच परिस्थिती असताना या बाबतींत अनेक वेळा निवेदने तक्रारी करुन सुद्धा संबंधीत विभाग मात्र आश्वासना पलीकडे स्थानिकांना सोई सुविधा पुरविण्यात कायमस्वरूपी अपयशी ठरत असलयाने दोन गावांतील नागरीकांच्या संपर्क पावसाळ्याच्या दिवसात कायम तुटत असल्याचे विदारक चित्र या परीसरात दिसुन येते. स्थानिक आमदार ,खासदार, स्थानिक प्रतिनिधी या भागाचे प्रतिनिधित्व करत असताना ढवलापुर घाटकुकडा या दोन गावांना जोडणारा १८ कि.मी चया रस्ता बनविणयाकरीता या प्रतिनिधी ना रस्ता तयार करण्याकरीता वन विभागाकडुन परवानगी प्राप्त करण्यात अपयश येत असल्याने येथील गावकरयाने जिव मुठीत घेऊन प्रवास करण्याची वेळ येथील नागरीकांनवर आली असुन आदिवासी भागातील या रस्त्याची दुरुस्ती लवकरात लवकर करण्यात यावी, अशी मागणी प्रिती मिथुन उईके माजी सरपंच ढवळापुर, चंद्रभान मरकाम माजी सरपंच, विनोद करनाहके, रमेश उईके, परंतु मरकाम, सेवक करनाहके, दिलीप भलावी, सुनील उईके, प्रकाश भलावी सह स्थानिक नागरीकानी केली आहे.

घाटपेढरी -ढवलापुर १८ कि.मी मुरुम मातीच्या असल्याने पावसाच्या दिवसांत या रस्त्याचे हाल बेहाल होतात. चिखल मातीतुन वाहनाने प्रवास केल्यास वाहने चिखलात अडकुन पडतात. तर पाई प्रवास जंगल व्याप्त परिसरातुन केल्यास वन्य प्राण्यांचे शिकार होण्याची शक्यता असते. चिखल माती तुटवत प्रवास करण्याची वेळ आदिवासी बांधवांवर आली आहे. लवकरात लवकर या रस्त्याची कायमस्वरुपी दुरुस्ती करण्यात यावी.

**- विठ्ठल पाटील, माजी उपसरपंच**

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'वंदे मातरम्' प्रदर्शनीचे उद्घाटन

## हर घर तिरंगा अभियानाअंतर्गत तिरंगा रांगोळी प्रदर्शनी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने केंद्र शासनाच्या सुरु असलेल्या 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत अनेक उपक्रमांचे आयोजन सुरु असून आज (ता.१०) कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे तिरंगा 'वंदे मातरम' प्रदर्शन आणि मोठ्या आकाराची तिरंगा रांगोळी प्रदर्शनी या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, महापौर निता ठाकरे, आमदार संजय भेंडे, आमदार कृपाल तुमाने, उपमहापौर लीला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्ष नेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, आयुक्त डॉ. विपीन, मुख्यमंत्री कार्यालयातील सहसचिव आशा पठाण, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, माजी महापौर दयाशंकर तिवारी, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, एमआयएमचे गटनेता शकील पटेल, मुस्लिम लिगचे गटनेता असलम मुल्ला खान, शिवसेना (उबाठा) गटनेता किशोर कुमेरिया,



शिवसेनेचे गटनेता गणेश चर्लेवार, बसपाच्या गटनेत्या हर्षला जयस्वाल, माजी आमदार नाना शामकुळे, महिला व बालकल्याण विशेष समिती सभापती सारिका नांदुरकर, नगरसेवक श्रीकांत आगलावे व इतर मान्यवर उपस्थित होते.

भारतीय स्वतंत्रता संघर्षा दरम्यान भारतीय ध्वजाचे बदलत गेलेले स्वरूप, स्वतंत्रता संघर्षातील 'वंदे मातरम्' चे प्रेरणादायी योगदान संदर्भातील माहिती आणि शहिद भगतसिंग, महात्मा गांधी, नेताजी सुभाष चंद्र बोस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आणि डॉ. राजेंद्र प्रसाद यांसारख्या स्वतंत्रता सैनिकांच्या प्रतिमेसह त्यांच्या कार्याचा आढावा विशेष आकर्षण ठरले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी मोठ्या आकाराच्या तिरंगा रांगोळीच्या कलेचे कौतुक केले व तिरंगा 'वंदे मातरम' प्रदर्शनीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये देशाच्या स्वतंत्रता संघषार्तील महापुरुषांच्या योगदाना विषयी जागरूकता आणि अभिमान निर्माण होईल, असे मत व्यक्त केले. दरम्यान पालिकेच्या आगामी कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी जास्तीतजास्त संख्येने सहभागी होऊन देशभक्तीच्या वातावरणाला अधिक प्रबळ करावे' असे आवाहन महापौरांच्या वतीने करण्यात आले.

# अनधिकृत बांधकामे हटवून शासकीय जागा तात्काळ ताब्यात घ्या!

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, येरखेडा येथील विकासकामांचा पालकमंत्र्यांकडून आढावा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

येरखेडा येथे मूलभूत विकासकामांसाठी जागेची नितांत गरज आहे. यासाठी नगरपंचायतीने मोकळ्या जागांची अचूक माहिती संकलित करण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. अनधिकृत बांधकामामुळे ज्या शासकीय जागांवर अतिक्रमण आहेत ती नियमानुसार तत्काळ काढून अशा शासकीय जागा तात्काळ ताब्यात घेण्याचे आदेश त्यांनी दिले.



येरखेडा नगरपंचायत क्षेत्रातील विविध विकासकामे, उपलब्ध निधी आणि प्रलंबित कामांचा आढावा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज घेतला. येरखेडा नगर पंचायत कार्यालयात झालेल्या या बैठकीस नगरपंचायतचे अध्यक्ष राजकुमार बर्वे, उपाध्यक्ष रंजना काळे, सभापती नरेश मोघे, उपसभापती ममता पितरेवार, गटनेते गजानन तिरपुडे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

**पट्टेवाटपाच्या कामाला गती द्या!**

शासकीय जागेवरील अतिक्रमणे काढताना शासन निर्णयानुसार ज्यांना संरक्षण दिले आहे त्यांच्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यास त्यांनी सांगितले. गोंडपुरा, सदाशिव नगर, मरटटोली, रविदास नगर तसेच बागडोर नाल्यावरील मोजणी न झालेल्या क्षेत्रांची तात्काळ मोजणी करून पट्टेवाटपाच्या कामाला गती देण्यास पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

**पाणीपुरवठा सुरळीत करावा**

या क्षेत्रात कन्हान नदीद्वारे पाणीपुरवठा हा वाढत्या लोकसंख्येचा विचार करता अपुरा पडत आहे. याचबरोबर जलशुद्धीकरण केंद्राची विद्यमान क्षमता अपुरी आहे. सध्या चार टाक्यांद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असून आणखी दोन टाक्यांचे बांधकाम लवकर मार्गी लावू असे त्यांनी सांगितले.

**शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा**

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अनुदानाचे वेळेत वितरण, 'आयुष्मान भारत' योजनेतील लाभार्थ्यांना आरोग्य कार्ड यासाठी शिबिराचे आयोजन करण्यास त्यांनी सांगितले.

## सांगली जिल्ह्यात शाळकरी विद्यार्थ्यांच्या वाहनाला अपघात, ६ वर्षीय चिमुकली ठार

**वृत्तसंस्था, सांगली**

मुंबईत गेल्या महिन्यात शाळेच्या बसवर झाड कोसळून एका शाळकरी मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. या घटनेनंतर सर्वच स्तरातून संताप व्यक्त करण्यात आला, तसेच मुंबई महापालिकेनं घटनेसंदर्भाने काही अधिकाऱ्यांवर कारवाया देखील केल्याचं पाहायला मिळालं. आता, सांगली जिल्ह्याच्या शिराळा तालुक्यातील आटूगडेवाडी येथे चारचाकी स्कूल व्हॅनच्या चालकाचा ताबा सुटून झालेल्या अपघातात सहा वर्षीय मुलीचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. तर, व्हॅनमधील इतरही मुले देखील जखमी झाली असून, त्यांच्यावर कोकरूड, शिराळा आणि कराड येथील विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत.

घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, शिराळा येथील सह्याद्री पब्लिक स्कूलची इंग्रजी माध्यमाची दुसरी शाखा वाघमारेवाडी येथे वर्षभरापूर्वी सुरू झाली आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठी शेडगेवाडी येथील युवराज कदम यांची चारचाकी (क्र. एमएच १० ईई ७९३१) वापरली जाते. आटूगडेवाडी येथील एका विद्यार्थ्याला आणण्यासाठी ते गेले होते. विद्यार्थ्याला घेऊन परतत असताना आटूगडेवाडी येथे चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. त्यानंतर चारचाकी रस्त्यालगतच्या पुलाच्या कठड्यावर जोरदार आदळली. या अपघातात चालकाच्या शेजारी बसलेली श्रीशा श्रीनाथ ऊर्फ गणेश इंगळे (वय ६, रा. मेणी) हिचा जागीच मृत्यू झाला. तर, अन्य मुले जखमी झाली असून, त्यांना तातडीने उपचारासाठी कोकरूड, शिराळा आणि कराड येथील विविध रुग्णालयांत दाखल करण्यात आले आहे.

# कोतापूर घुमेवाडी स्मशानभूमीच्या रस्त्याचा प्रश्न ऐरणीवर, माजी सरपंच विजय सुतार १५ ऑगस्टपासून उपोषणाला

**दै. सिंहवाणी वृत्त, राजापूर**

राजापूर तालुक्यातील कोतापूर घुमेवाडी येथील स्मशानभूमीकडे जाण्यासाठी सुयोग्य रस्ता उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी कोतापूरचे माजी सरपंच विजय परशुराम सुतार यांच्यासह काही ग्रामस्थांनी १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८ वाजता कोतापूर ग्रामपंचायतीसमोर बेमुदत उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचे लेखी निवेदन त्यांनी संबंधित प्रशासनाकडे सादर केले आहे. कोतापूर घुमेवाडी स्मशान भूमीकडे जाणाऱ्या रस्त्याची सध्या अत्यंत दुरवस्था झाली असून, घुमेवाडी तसेच सुतारवाडी परिसरातील मृत व्यक्तींवर अनेक वर्षांपासून याच स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जात आहेत. पूर्वी या ठिकाणी जाण्यासाठी पायवाट उपलब्ध होती. मात्र, काही



काळापूर्वी झालेल्या भूस्खलनामुळे ही वाट मोठ्या प्रमाणात खचून गेली. परिणामी मृतदेह स्मशानभूमीपर्यंत नेणे हे ग्रामस्थांसाठी अत्यंत कष्टाचे आणि धोकादायक ठरत आहे.

स्मशानभूमी जाण्यासाठी योग्य रस्ता निर्माण व्हावा, यासाठी माजी सरपंच विजय सुतार गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा करत आहेत. याच मागणीसाठी त्यांनी २५ मे २०२६ रोजी सरपंच, ग्रामपंचायत कोतापूर यांच्याशी लेखी पत्रव्यवहारही केला होता. मात्र, ज्या जागेतून रस्ता जाणार आहे त्या जागामालकांची संमती घेऊन येण्याचे ग्रामपंचायतीकडून त्यांना सांगण्यात आले.

मात्र, हा रस्ता ग्रामपंचायतीच्या अखत्यारीतील विषय असल्याने संबंधित जागामालकांशी ग्रामपंचायतीनेच चर्चा करून पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे सुतार यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे. त्यासाठी जागामालकांची स्वतंत्र भेट घेणे किंवा ग्रामसभेची विशेष बैठक आयोजित करून घुमेवाडी व सुतारवाडीतील ग्रामस्थांच्या उपस्थितीत या विषयावर निर्णय घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. स्वतः वैयक्तिकरित्या जागामालकांकडे जाऊन संमतीपत्र मागणे योग्य नसल्याचेही त्यांनी ग्रामपंचायतीला यापूर्वी कळविले आहे.

विजय सुतार यांनी कोतापूर ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून पाच वर्षे काम केले आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कामकाजाचा अनुभव असतानाही सध्याच्या प्रशासनाकडून आपल्याला अत्यंत वाईट अनुभव येत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी घुमेवाडीतील एका व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर अंत्यविधीसाठी मृतदेह स्मशानभूमीकडे नेताना ग्रामस्थांना अत्यंत गंभीर परिस्थितीचा सामना करावा लागल्याची घटना त्यांनी निवेदनात नमूद केली आहे. नदीला मोठ्या प्रमाणात पाणी असल्याने जंगलातून मृतदेह घेऊन जाताना दोन-दोन व्यक्तींना तो उचलून न्यावा लागला. याचवेळी गांजील माशा पिसाळल्याने घाबरलेल्या ग्रामस्थांना मृतदेह खाली ठेवून जीवाच्या आकांताने घराकडे धाव घ्यावी लागल्याचे सुतार यांनी म्हटले आहे.

ग्रामस्थांच्या जीवनातील शेवटचा प्रवासदेखील सुरक्षित आणि सुलभ नसावा, ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याचे सांगत या प्रश्नावर सातत्याने आवाज उठवूनही अद्याप रस्त्याचा प्रश्न सुटलेला नसल्याने अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याचे विजय सुतार यांनी स्पष्ट केले आहे. यामुळे १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८ वाजता कोतापूर ग्रामपंचायतीसमोर आपण आणि काही ग्रामस्थ बेमुदत उपोषणाला बसणार असल्याचे त्यांनी निवेदनातून जाहीर केले आहे. या संदर्भातील निवेदन राजापूर तहसील कार्यालय, राजापूर पंचायत समिती तसेच रत्नागिरी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आले आहे. त्यामुळे कोतापूर घुमेवाडी स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचा प्रलंबित प्रश्न प्रशासन आता कशा पद्धतीने मार्गी लावणार, याकडे कोतापूर परिसरातील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# नयाकुंड हद्दीत भरधाव ट्रकच्या धडकेत १ ठार

## दुचाकीचेही नुकसान ट्रक चालक फरार, पारशिवनी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी पोलीस स्टेशन हद्दीतील आमडी ते पारशिवनी रोडवर रविवारी ९ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ६ वाजता दरम्यान भरधाव ट्रकने दुचाकीस्वाराला धडक दिल्याने एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर ट्रक चालक ट्रकसह घटनास्थळावरून पळून गेला.

मिळालेल्या माहिती नुसार घटना अशी घडली की, रविवारी ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास नयाकुंड हद्दीतील सुर्या लॉज समोर आमडी ते पारशिवनी रोडवर ८ किमी पूर्वेला नयाकुंड हद्दीत हा अपघात झाला. आमडीफाटा कडून पारशिवनीकडे जाणाऱ्या ट्रक क्र. एमएच ४० सी.एम.४६५७ च्या चालकाने वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे ट्रक चालवले. यावेळी त्याने रोडच्या कडेला जाणाऱ्या दुचाकीस्वाराला जोरदार धडक दिली. या अपघात बबन दामोदर मस्के वय ५४ वर्षे रा. चिंचभवन ता. पारशिवनी जि. नागपूर यांचा जागीच मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, बबन मस्के हे एका खाजगी कंपनीत काम करत होते. ते सायंकाळी नोकरी संपवून ते दुचाकीने गावी चिंचभवनला जात होते. दरम्यान हा अपघात झाला. आणि दुचाकीचेही नुकसान झाले. ट्रक चालकाने रोडच्या कडेला उभ्या असलेल्या दुचाकी क्र. एमएच३१ बी.एन.७३११ ला धडक देऊन नुकसान केले. अपघातानंतर न थांबता चालक ट्रकसह पळून गेला. ही घटना माहीत होताच या प्रकरणी सुर्या लॉजिंग अँड बोर्डिंग येथे गार्ड म्हणून काम करणारे फिर्यादी गणेश शिवचरण कोडवते वय २६ वर्षे यांनी पोलीसात माहिती दिली. दिलेल्या तोंडी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन पारशिवनी येथे बीएनएस कलम २८१,१०६ (१),३२४(४) सहकलम १८४,१३४, १७७ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा दाखल केला.या गुन्ह्याची नोंद पोहवा मोरेश्वर नागोसे यांनी केली असून पुढील तपास पोउपनी पांडे करीत आहेत. पारशिवनी ग्रामीण रुग्णालयात मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला होता. शवविच्छेदनानंतर सोमवारी सकाळी १० ऑगस्ट रोजी मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.सध्या फरार ट्रक व चालकाचा शोध पोलीस घेत आहेत.

# जलालखेड्यात विश्व आदिवासी दिवस उत्साहात, संस्कृतीच्या जतनासह एकतेचा जागर

## जय जोहार समितीच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन; शिक्षण, संघटन आणि सामाजिक प्रगतीचा दिला संदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील जलालखेडा येथील वार्ड क्रमांक १ मध्ये जय जोहार समितीच्या वतीने ९ ऑगस्ट रोजी विश्व आदिवासी दिवस मोठ्या उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. आदिवासी समाजाच्या गौरवशाली संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या या कार्यक्रमाला महिला, पुरुष, युवक-युवती तसेच ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या माध्यमातून आदिवासी समाजाची समृद्ध संस्कृती, परंपरा, रूढी, कला तसेच जल, जंगल आणि




जमिनीशी असलेले अतूट नाते याबाबत जनजागृती करण्यात आली. आपल्या पूर्वजांनी जपलेल्या परंपरा आणि संस्कृतीचे जतन करणे ही प्रत्येक समाजबांधवाची जबाबदारी असून, आधुनिक काळात शिक्षण आणि संघटनाच्या माध्यमातून समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची गरज असल्याचे यावेळी मार्गदर्शनातून सांगण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे नागपूर कार्याध्यक्ष नरेश असरडे तसेच जलालखेडा पोलिस स्टेशनचे ठाणेदार विनोद जावळे प्रामुख्याने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे आयोजकांच्या वतीने स्वागत व सत्कार करण्यात आला.

यावेळी आदिवासी समाजातील युवकांच्या शिक्षणाचा प्रश्न, रोजगाराच्या संधी, सामाजिक एकता, शासनाच्या विविध योजना आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी संघटित प्रयत्न करण्याबाबत चर्चा करण्यात आली. युवकांनी शिक्षणाला प्राधान्य देत आपल्या समाजाच्या विकासासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. महिला व युवक-युवतींच्या मोठ्या सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष उत्साह प्राप्त झाला. पारंपरिक संस्कृती, सामाजिक बांधिलकी आणि समाजाच्या एकतेचे दर्शन घडविणाऱ्या वातावरणात विश्व आदिवासी दिवस साजरा करण्यात आला. आदिवासी समाजाच्या हक्कांसोबतच त्यांच्या सांस्कृतिक वारशाचे जतन, सामाजिक सलोखा आणि पुढील पिढीला आपल्या परंपरांची ओळख करून देण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. एकता, शिक्षण आणि संघटनातून समाजाची प्रगती हा संदेश देत कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जय जोहार समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच जलालखेडा परिसरातील समाजबांधवांनी परिश्रम घेतले.

थोडक्यात

## सहयोग सोसायटी, बेसा येथे जाहिर आभार सभा उत्साहात

**१५ वर्षांपासून प्रलंबित सार्वजनिक जागेवरील अतिक्रमण हटविल्याबद्दल नागरिकांकडून समाधान व्यक्त**



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सहयोग सोसायटी, बेसा येथील नागरिकांच्या वतीने आज जाहिर आभार सभेचे आयोजन करण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सार्वजनिक जागेवरील अतिक्रमण हटवून ती जागा नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्याबद्दल या सभेचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे १५ वर्षांपूर्वी सहयोग सोसायटीच्या सार्वजनिक उपयोगासाठी राखीव असलेल्या जागेवर प्लॉट पाडून अतिक्रमण करण्यात आले होते. सदर जागा अतिक्रमणमुक्त करून नागरिकांच्या उपयोगासाठी उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक नागरिक सातत्याने प्रयत्नशील होते. या प्रकरणात न्यायालयीन आदेश तसेच एसडीओ यांचा अहवाल असूनही प्रत्यक्ष कारवाई होत नव्हती.

अखेर आदरणीय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्तक्षेपामुळे या प्रकरणाला गती मिळाली. त्यांच्या पाठपुराव्यानंतर जिल्हाधिकारी तसेच नगरपरिषद प्रशासनाला आवश्यक निर्देश देण्यात आले. त्यानुसार दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी भारत नंदनवार यांनी प्रत्यक्ष कारवाई करून अतिक्रमण हटविले व सदर जागा उद्यानासाठी मोकळी करून दिली. या कार्यात मोलाचे योगदान देणारे सामाजिक कार्यकर्ते संजय भोयर तसेच नगरसेविका विद्या भोयर यांच्या योगदानाबद्दल नागरिकांच्या वतीने जाहिर आभार व्यक्त करण्यात आले. तसेच त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला सहयोग सोसायटी तसेच परिसरातील विविध सोसायट्यांमधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी परिसरातील विविध समस्या मांडल्या. नागरिकांच्या समस्या ऐकून घेत नगरसेविका विद्या भोयर यांनी त्या सोडविण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्याचे तसेच सदर सार्वजनिक जागेवर लवकरात लवकर उद्यान विकसित करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. दीर्घकाळ प्रलंबित असलेली सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त होऊन नागरिकांच्या उपयोगासाठी उपलब्ध झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. या कारवाईमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, सदर जागेवर उद्यान विकसित झाल्यानंतर परिसराच्या सौंदर्यातही भर पडणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## एआयआयबीच्या शिष्टमंडळाकडून विकासकामांची पाहणी, महावितरणच्या कामगिरीबद्दल व्यक्त केले समाधान!



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शेतकऱ्यांना दिवसा आणि भरवशाचा वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने नागपूर परिमंडळात सुरू असलेल्या विद्युत प्रणाली सक्षमीकरण व बळकटीकरणाच्या विविध विकासकामांची बीजिंगस्थित एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक (एआयआयबी) च्या प्रतिनिधी मंडळाने नुकतीच पाहणी केली. एआयआयबीच्या अर्थसाहाय्यातून सुरू असलेल्या प्रकल्पांच्या या प्रत्यक्ष पाहणीदरम्यान प्रतिनिधी मंडळाने महावितरणच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल व दजेर्दार कामाबद्दल अत्यंत समाधान व्यक्त केले आहे. ग्रामीण भागाच्या विकासाला अधिक गतिमान करण्यासाठी एआयआयबीच्या अर्थसाहाय्यातून नागपूर परिमंडळात नवीन विद्युत उपकेंद्रे उभारण्यात येत आहेत. यासोबतच अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर बसवणे, उपकेंद्रांची क्षमता वाढवणे तसेच उपकेंद्रांच्या ऊर्जीकरणासाठी आवश्यक ३३ केव्ही व ११ केव्ही वाहिन्या टाकण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. या सर्व विकासकामांचा उच्च दर्जा, कामाची गती तसेच सुरक्षा व पर्यावरणाच्या दृष्टीने करण्यात आलेल्या उपाययोजनांचा सखोल आढावा घेण्यासाठी या उच्चस्तरीय मंडळाने हा दौरा केला. या दौऱ्यादरम्यान मौदा विभागातील सेलू येथील सौर कृषी प्रकल्पाच्या कामाची प्रगती, तांत्रिक बाबी आणि सुरक्षा मानकाच्या अंमलबजावणीची सविस्तर माहिती अधिकाऱ्यांनी सादर केली.

या पाहणी दौऱ्यात एआयआयबीच्या प्रतिनिधी मंडळात सहयोगी अधिकारी शुवम सरकार रॉय, वरिष्ठ पर्यावरणतज्ज्ञ इंद्राणी घोष, जलतज्ज्ञ स्मिता मिश्रा, सामाजिक तज्ज्ञ सू ट्रान क्वाय, पर्यावरण सल्लागार दमनजितसिंह मिन्हास आणि सल्लागार राजीव मिश्रा यांचा समावेश होता. त्यांच्या समवेत महावितरणचे मुख्य अभियंता राजेश नाईक, अधीक्षक अभियंता संजय वाकडे, कार्यकारी अभियंता अजय कोलते यांच्यासह महावितरणचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दौऱ्यादरम्यान शिष्टमंडळाने कामठी तालुक्यातील शिवणी गावाचे रहिवासी मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेचे लाभार्थी कोरडे यांची प्रत्यक्ष भेट घेतली आणि त्यांच्याशी संवाद साधला. या भेटीदरम्यान मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांनी योजनेची सविस्तर माहिती दिली; ज्यामध्ये अर्ज प्रक्रिया, लाभार्थी निवड, पंप बसवणे ते प्रत्यक्षात कार्यान्वित करणे या संपूर्ण प्रक्रियेची माहिती देण्यात आली. शिष्टमंडळाने या महत्त्वाकांक्षी योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीचे आणि त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनावर झालेली सकारात्मक परिवर्तनाची मुक्तकंठाने प्रशंसा केली. या शिष्टमंडळाचे यजमानपद भूषवणे आणि सौर उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीतील उत्कृष्ट नेतृत्वासाठी मुख्य अभियंता राजेश नाईक यांचा शिष्टमंडळातील सदस्यांच्या हस्ते झालेला सन्मान नागपूर परिमंडळासाठी अत्यंत अभिमानास्पद ठरला. अधिक हरित भविष्यासाठी शाश्वत जलव्यवस्थापन आणि अक्षय ऊर्जेला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने महावितरणची ही वाटचाल अशीच यशस्वीपणे सुरू राहणार असल्याची माहिती राजेश नाईक यांनी यावेळि दिली.

# नरखेड तालुक्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबेना!

## कर्जबाजारीपणा व सततच्या नापिकीला कंटाळून उमठ्यातील ४४ वर्षीय शेतकऱ्याची विहिरीत उडी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबता थांबेना, अशी चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. कर्जबाजारीपणा, सततची नापिकी, शेतीसाठी भांडवलाची अडचण आणि मुलांच्या शिक्षणाचा खर्च या विवंचनेतून उमठा येथील ४४ वर्षीय शेतकरी सुखदेव नामदेवराव पांडे यांनी रविवारी रात्री घराजवळील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली.

सुखदेव पांडे यांच्याकडे चार एकर शेती होती. त्यांनी सुमारे चार वर्षांपूर्वी भारतीय स्टेट बँक, जलालखेडा शाखेतून ५० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. याशिवाय त्यांच्यावर सुमारे दीड



लाख रुपयांचे खासगी कर्ज असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. मुद्दल व व्याजाचा वाढता बोजा मिळून त्यांच्यावर सुमारे अडीच लाख रुपयांचे कर्ज झाले होते.

शासनाच्या कर्जमाफीच्या पहिल्या यादीत नाव न आल्याने त्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला नाही. त्यातच मागील काळातील सततची नापिकी आणि शेतीच्या वाढत्या खर्चामुळे कर्जाची परतफेड कशी करायची, पुढील हंगामासाठी पैसा कुठून आणायचा आणि मुलींच्या शिक्षणाचा खर्च कसा भागवायचा, या विवंचनेत ते असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. नवीन कर्ज मिळत नसल्याने आर्थिक अडचणी आणखी वाढल्या होत्या. या परिस्थितीतून त्यांनी टोकाचे पाऊल उचलले असावे, अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे.

रविवारी रात्री सुमारे ८ वाजताच्या सुमारास सुखदेव पांडे यांनी घराजवळील विहिरीत उडी घेतली. विहिरीत काहीतरी पडल्याचा आवाज परिसरातील नागरिकांना आला. नागरिकांनी तत्काळ विहिरीकडे धाव घेत टॉर्चच्या साहाय्याने पाहिले असता सुखदेव पांडे विहिरीत पडल्याचे निदर्शनास आले. गावकऱ्यांनी त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू केला.

दरम्यान, पोलिस पाटील निलेश ठाकरे यांनी घटनेची माहिती ठाणेदार विनोद जावळे यांना दिली. माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. गावकरी व पोलिसांच्या मदतीने सुखदेव पांडे यांचा मृतदेह विहिरीबाहेर काढण्यात आला. पोलिस उपनिरीक्षक आकाश महाकाळ, पोलिस कर्मचारी शिवा सौंदळे व जाकीर शेख यांनी घटनास्थळी पंचनामा केला.

मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी काटोल येथे पाठविण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे. त्यांच्या पश्चात पत्नी कविता आणि दोन मुली असा परिवार आहे.

**शासनाच्या शवविच्छेदनगृहाचा उपयोग कधी होणार?**

जलालखेडा येथे शासनाने याच वर्षी सुमारे १३ लाख रुपये खर्च करून शवविच्छेदनगृह उभारले आहे. यापूर्वी येथे शवविच्छेदन करण्यात आल्याचेही सांगण्यात येते. मात्र जलालखेडा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. अरविंद मंदारी यांनी शवगृह सहाय्यकाचे पद रिक्त असल्याने मृतदेह शवविच्छेदनासाठी काटोल येथे पाठविला.

त्यामुळे आधीच दुःखाच्या प्रसंगात असलेल्या पांडे कुटुंबीयांना शवविच्छेदनासाठी सुमारे ४० किलोमीटर दूर काटोल येथे जावे लागले. शासनाने लाखो रुपये खर्च करून उभारलेल्या शवविच्छेदनगृहात आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची गरज यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित झाली आहे.

### शेतकरी आत्महत्यांवर ठोस उपाययोजनांची गरज

नरखेड तालुक्यात शेतकरी आत्महत्यांच्या घटना वारंवार समोर येत असल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. कर्जमाफीचा लाभ, पीकविमा, पीक नुकसानभरपाई, वेळेवर पीककर्ज आणि शेतीसाठी आवश्यक आर्थिक मदत याबाबत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष दिलासा मिळणे आवश्यक आहे. केवळ कागदोपत्री योजना न राबविता अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांपर्यंत प्रशासनाने पोहोचून त्यांच्या समस्या जाणून घेण्याची मागणी होत आहे.

## 'दिल दोस्ती दुनियादारी' ग्रुपचा चिखलदरा येथे सामाजिक उपक्रम, आदिवासी विद्यार्थ्यांना जीवनावश्यक साहित्याचे वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अमरावती, वर्धा व नागपूर येथील अध्यक्ष सचिन घरपाळ, सतीश शेंडे, मंगेश दिवटे, अश्विन भेंडे, सारंग खोडे, संतोष लसणकर, राजेश भोगे, सतिशभाऊ चवरे, रोहित महाले, प्रसन्ना चौधरी, महेश अडसुळे समविचारी मित्रांनी स्थापन केलेल्या 'दिल दोस्ती दुनियादारी' या सामाजिक समूहातर्फे दिनांक ७, ८ व ९ ऑगस्ट रोजी चिखलदरा परिसरातील आदिवासी भागात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

या उपक्रमांतर्गत समूहाच्या सदस्यांनी कै. सुधाकर नाईक आदिवासी आश्रम शाळा, सलोना येथे भेट देऊन तेथील निवासी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या शासकीय आश्रम शाळेत पाच वर्षांवरील विविध वयोगटातील विद्यार्थी शिक्षण घेत असून, त्यांना दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या विविध आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर यावेळी आनंदाचे भाव पाहायला मिळाले. यावेळी समूहाचे अध्यक्ष अश्विन भाऊ, हे राष्ट्रीय स्तरावरील माजी खेळाडू असल्याने त्यांनी शाळेतील कबड्डी व व्हॉलीबॉल खेळाडूंना खेळाचे साहित्य तसेच सर्व खेळाडूंना खेळाचे गणवेश उपलब्ध करून देण्याची घोषणा केली. त्यासाठी शाळेतील शिक्षकांकडून विद्यार्थ्यांची मापेही घेण्यात आली असून, लवकरच खेळाचे साहित्य व गणवेश विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात येणार आहेत.

'दिल दोस्ती दुनियादारी' समूहाचा हा सामाजिक उपक्रम दरवर्षी नियमितपणे राबविण्यात येत असून, समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत शिक्षण, क्रीडा आणि सामाजिक विकासासाठी समूह सातत्याने कार्यरत आहे. या उपक्रमात नागपूर, वर्धा व अमरावती येथील तसेच दिल दोस्ती दुनियादारी समूहातील इतर सर्व सदस्य उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल स्थानिक नागरिक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी समूहाचे मनःपूर्वक आभार मानून त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. दिल दोस्ती दुनियादारी समूहातील इतर सर्व सदस्य उपस्थित होते.

या उपक्रमाबद्दल स्थानिक नागरिक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी समूहाचे मनःपूर्वक आभार मानून त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

## प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक व पत्रकार महेश्वर भिकाजी तेटांबे यांचा वाढदिवस उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई -गुरुनाथ तिरपणकर**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व कलाविश्वातील एकोपा आणि आपुलकीचे व्यासपीठ ठरलेल्या परेल येथील 'लक्ष्मी म्युझिकल स्टुडिओ' मध्ये, रंगभूमी व चित्रपट सृष्टीतील हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व, प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्भीड पत्रकार महेश्वर भिकाजी तेटांबे यांचा ५५ वा वाढदिवस अत्यंत उत्साही, मंगलमय आणि भारदस्त वातावरणात मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. कला आणि संगीताच्या सुरावटीत रंगलेल्या या सोहळ्याला समस्त गायक, अभिनेते, तंत्रज्ञ आणि क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांनी सपरिवार उपस्थिती दर्शवून महेश्वरजींवर शुभेच्छांचा वर्षाव केला.

या भव्यदिव्य वाढदिवसाच्या आयोजनामध्ये लक्ष्मी म्युझिकल स्टुडिओचे सर्वेसर्वा व 'वॉईस ऑफ मुकेश' रामजी डोडीया, लक्ष्मी डोडीया, कार्यकारी निर्माते तथा साऊंड इंजिनिअर काफिल अन्सारी, प्रसिद्ध गायक तथा समाजसेवक डॉ. मंगेश पेडामकर, निलेश घाडी आणि प्रसिद्ध गायिका रुची पाटील यांचे मोलाचे व प्रेरणादायी सहकार्य लाभले. कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत भावूक आणि मांगल्याच्या वातावरणात झाली. उपस्थित सर्व स्नेही व गायक मित्रांनी महेश्वरजींचे औक्षण केले. त्यानंतर महेश्वरजींच्या सुहद्हस्ताने केक कापण्यात आला आणि "आयुष्याची ५५ वर्षे आनंदाने आणि कर्तृत्वाने पूर्ण झाली," याची साक्ष या सोहळ्याने दिली.

# जागतिक आदिवासी दिवस व ऑगस्ट क्रांती दिन साजरा

## रामटेक येथे भव्य रॅली, सामाजिक चर्चासत्र व सभेचे आयोजन, आदिवासी समाजाच्या विविध मागण्यांचा ठराव

**दै. सिंहवाणी वृत्त, काचूरवाही**

जागतिक आदिवासी दिवस व ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त रामटेक येथे रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. गंगा भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रामटेक येथे समाज बांधवांच्या मोठ्या उपस्थितीत सामाजिक चर्चासत्र व सभा पार पडली.

कार्यक्रमाची सुरुवात गोंडवाना गोटूल, शीतलवाडी-चारगाव रोड, रामटेक येथील भूमक संघाद्वारे सप्तरंगी ध्वजारोहणाने करण्यात आली. त्यानंतर गोटूल शीतलवाडी चौक येथून भव्य रॅलीला सुरुवात झाली. यानंतर आदिवासी पारंपरिक नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तिरु. मधुकरजी उईके, केंद्रीय अध्यक्ष, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशन, नागपूर हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून तिरु. विजय कोकोडे, केंद्रीय सरचिटणीस, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशन, नागपूर, तसेच हरिश्चंद्र सरियाम, माजी अधीक्षक ट्रायबल ऑफिस, नागपूर, डॉ. नरेंद्र कोडवते,



शिवराम भलावी, प्रा. डॉ. नरेश धुर्वे, दुर्गा सरियाम, माजी समाजकल्याण सभापती, जि. प. नागपूर, महेश ब्राम्हनोटे, माजी सभापती समाजकल्याण, जि. प. नागपूर, देवराव धुर्वे, माजी जि. प. सदस्य, नागपूर, हरीश उईके, माजी जि. प. सदस्य, नागपूर, किरण देवराव धुर्वे, माजी सभापती पंचायत समिती, रामटेक, चंद्रकांत कोडवते, माजी सभापती पंचायत समिती, रामटेक व महेश मडावी, माजी सदस्य पंचायत समिती, रामटेक यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच ९ ऑगस्ट १९४२ रोजी सुरू झालेल्या 'चले जाव' अर्थात 'भारत छोडो' आंदोलनाच्या स्मृतींनाही यावेळी उजाळा देण्यात आला. कार्यक्रमादरम्यान इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. तसेच पदोन्नती मिळविणारे कर्मचारी व सेवानिवृत्त झालेल्या समाजबांधवांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

**आदिवासी समाजाच्या विविध मागण्यांचा ठराव**

सभेत आदिवासी समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बोगस आदिवासींचे अतिक्रमण व अवैध लाभ तातडीने रद्द करून त्या पदांवर पात्र खऱ्या अनुसूचित जमातीतील उमेदवारांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

आरक्षणाच्या नवीन बिंदुनामावलीत आवश्यक दुरुस्ती करून अनुसूचित जमातीच्या आरक्षणासाठी पूर्वीप्रमाणे कार्यवाही करावी, आदिवासींसाठीच्या विविध योजनांमध्ये ४० टक्क्यांपेक्षा अधिक अनुदान देऊन जास्तीत जास्त नागरिकांना योजनांचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणीही करण्यात आली.

वन्य प्राण्यांपासून आदिवासी व शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात नुकसान झालेल्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय अथवा निमशासकीय नोकरीमध्ये आरक्षणाची तरतूद करावी, अशी मागणी करण्यात आली. देशातील विविध विकासात्मक योजनांमध्ये आदिवासी समाजातील पात्र व्यक्तींना सदस्यत्व देण्यात यावे. ९ ऑगस्ट हा जागतिक आदिवासी दिवस म्हणून शासकीय सुट्टी जाहीर करून शासकीय स्तरावर विविध कार्यक्रम आयोजित करावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

नागपूर जिल्ह्यातील रामटेक व पारशिवनी तालुक्यातील आदिवासीबहुल सुमारे २०० गावांमध्ये पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. ज्या भागात हिंसक वन्यप्राण्यांचा मोठ्या प्रमाणावर वावर आहे, तेथील शेतकऱ्यांना उदरनिर्वाहासाठी प्रति एकर ५० हजार रुपये वार्षिक अनुदान देण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली. रामटेक व पारशिवनी तालुक्यात आदिवासी समाजाची लोकसंख्या लक्षणीय असल्याने रामटेक विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव करण्यात यावा, अशी मागणी सभेत करण्यात आली.

**घरकुल अनुदान वाढविण्याची मागणी**

डोंगराळ व दुर्गम भागातील घरकुल बांधकामासाठी राज्य शासनाकडून दिले जाणारे १.३० लाख रुपये तसेच सर्वसाधारण क्षेत्रासाठी दिले जाणारे १.२० लाख रुपयांचे अनुदान अपुरे असल्याचे सांगत ही रक्कम वाढवून प्रति घरकुल १० लाख रुपये करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

तसेच आदिवासी विकास विभागामार्फत रामटेक येथे सुरू असलेल्या आदिवासी मुला-मुलींच्या वसतिगृहासाठी स्वतंत्र व सुसज्ज इमारत उभारण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली.

कार्यक्रमात विजय कोकोडे, डॉ. नरेंद्र कोडवते, प्रा. डॉ. नरेश धुर्वे व हरिश्चंद्र सरियाम यांनी समाजबांधवांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रदीप कुमरे, अशोक उईके, रामनाथ धुर्वे, देवा कोकोडे, घनश्याम सरियाम, सुनील कोडापे, दुर्गा सरियाम, सुलोचना, सयाबाई कोरचे, अंजिरा वरकडे, मधू वरकडे, हरदास कुमरे, कमलाकर कोडवते, विजय सिरसाम, पुरुषोत्तम हटवार, शुभम कामळे, विष्णू भलावी, राजा वरठी, संजय कोडापे, भलावी सर, कुमरे सर, अशोक मरकाम, जगदीश इनवते, प्रकाश धुर्वे, अनिल कुमरे, नीलकंठ कुमरे, बबलू, गुड्डू उईके, शिवराम भलावी, नरेश कोकणी यांच्यासह रामटेक व परिसरातील असंख्य आदिवासी समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशन, शाखा रामटेकचे सचिव प्रदीप कुमरे व अंजिरा मधुकर वरकडे यांनी केले. प्रास्ताविक जगदीश इनवते (जे. डी.) यांनी केले, तर आभार शिक्षण विस्तार अधिकारी, पारशिवनी, सुनील कोडापे यांनी मानले. कार्यक्रमाच्या सांगतेनंतर उपस्थित समाजबांधवांनी सामूहिक भोजनाचा आस्वाद घेतला. उत्साहपूर्ण वातावरणात जागतिक आदिवासी दिवस व ऑगस्ट क्रांती दिनाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.